POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२०६ ● मुंबई, शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ‘श्री गुरु तेग बहादुर साहिब जी’ यांच्या ३५०व्या शहिदी समागमाचे नवी मुंबईत आयोजन

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी नवी मुंबई येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांसाठी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.

नवी मुंबई येथे होणाऱ्या हिंद-दी-चादर कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अखिल भारतीय धर्म जागरण समितीचे प्रमुख शरद रावजी ढोले, राज्यस्तरीय समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, सहसमन्वयक जसपालसिंग सिद्धू, राज्यस्तरीय समन्वय समितीचे निमंत्रक बल मलकित सिंह, अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य हॅपी सिंग उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले की, या दोन दिवसीय कार्यक्रमात देश विदेशातून १८ ते २० लाख भाविक येणे अपेक्षित आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व नियोजन करण्यात आले असून, मुख्य मंडपात एकावेळी ८० हजार ते १ लाख भाविक आसनस्थ होतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी १५० पेक्षा अधिक विशेष एनएमएमटी बस सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. स्वतंत्र पार्किंग स्थळे



३८, विशेष तीन हेलिपॅडची व्यवस्था, २५ हजार भाविकांची निवास व्यवस्था, तात्पुरती स्वच्छतागृहे १ हजार पेक्षा अधिक, स्वच्छता कर्मचारी ५०० पेक्षा अधिक उपलब्ध असणार आहेत.

तसेच आरोग्याच्या दृष्टीने डॉक्टर व पॅरामेडिकल कर्मचारी ३०० पेक्षा अधिक असणार आहेत. तात्पुरती वैद्यकीय केंद्रे १५ पेक्षा अधिक, तात्पुरते एक आयसीयू केंद्र उपलब्ध करण्यात आले आहे. राखीव खाटा (जवळील रुग्णालये) ३५०, तर नजीकच्या रूग्णालयात राखीव आयसीयू खाटा ७५उपलब्ध आहेत. या दोन दिवसीय कार्यक्रमात १० हजारांपेक्षा अधिक स्वयंसेवकांचा सहभाग असणार असल्याची माहिती डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.

तसेच शिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन तसेच भगत नामदेव संप्रदाय या समाजातील संत आणि रागी जत्थेदार उपस्थित राहणार आहेत. २७ फेब्रुवारी रोजी नगर किर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या शौर्य, धर्मस्वातंत्र्य, मानवता आणि न्यायमूल्यांचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश असल्याची माहिती रामेश्वर नाईक यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाची संपुर्ण माहिती https://gurutegbahadurshahidi.com/home या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

**राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडणार**
**-राज्य समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक**


**शहिदी समागम कार्यक्रमासाठी प्रशासन सोयी-सुविधांसह सज्ज**
**-कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी**

**शहिदी समागमाच्या निमित्ताने राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन : राज्य समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक**

राज्यस्तरीय समन्वयक रामेश्वर नाईक म्हणाले की, 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त देशभर विविध प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. अल्पसंख्याक विकास विभाग व शहिदी समागम राज्य समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई येथे भव्य शहिदी समागमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थितांना संबोधित करणार आहेत. तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जम्मू-काश्मीरचे उप राज्यपाल मनोज सिन्हा, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिग सैनी, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी, तामीळनाडू येथील भाजपा नेते अण्णामलाई, योग गुरु बाबा रामदेव, बागेश्वर धाम पीठाधीश्वर धीरेंद्र कृष्ण शास्त्री, दीदी मा साध्वो ऋतंभरा उपस्थित राहणार आहेत.

## मुंबई पोलिसांच्या १२९० वाहनांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण



■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईत आणि महानगर परिसरात घडलेल्या गुन्ह्याच्या ठिकाणी जलद गतीने पोहोचणे, १०० आणि ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर आलेल्या तक्रारीच्या कॉलवर विनाविलंब पोहोचणे यासाठी मुंबई पोलीस दलात १२९० नवीन वाहनांचा समावेश करण्यात आला आहे.

नरिमन पॉईंट येथील मुरली देवरा चौकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून आज या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले.

कार्यक्रमाला गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (प्रशासन) एस. जयकुमार यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी उपस्थित होते.

या वाहनांमध्ये ६५७ दुचाकी ६३३ चार चाकी वाहनांचा समावेश आहे. चार चाकी वाहनांमध्ये स्कॉर्पिओ आणि मोठी अर्मेनिया वाहने आहेत. सध्या मुंबई पोलिसांचा हेल्पलाईनवर आलेल्या तक्रारीचा प्रतिसाद वेळ ५.३० मिनिटे आहे. हा प्रतिसाद वेळ या वाहनांच्या समावेशामुळे निश्चितच आणखी कमी होणार आहे. गुन्ह्याची जलद गतीने उकल करून पीडितांना तातडीने न्याय देणे या वाहनांमुळे शक्य होणार आहे.

मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत एकूण ९० पोलीस स्टेशन कार्यरत आहेत. या प्रत्येक पोलीस स्टेशनला पाच दुचाकी, चार स्कॉर्पिओ आणि मोठे अर्मेनिया वाहन एक अशाप्रकारे एकूण दहा वाहने देण्यात येणार आहेत. ही चार चाकी वाहने मोबाईल डाटा टर्मिनल, जीपीएस यंत्रणा, व्हेईकल ट्रेकिंग यंत्रणा आदी आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त आहेत.

## यशवंत बँकेच्या फलटण शाखेत ईडीचे छापे
### ११२ कोटीच्या घोटाळ्याप्रकरणी भाजपच्या नेत्याला बेड्या ठोकल्या

■मुंबई। प्रतिनिधी,

सकलेन मुलानी - कराडमध्ये बहुचर्चित असलेल्या यशवंत बँक घोटाळा प्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या घोटाळ्यातील आरोपी आणि सहकार परिषदेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर यांना मध्यरात्री पोलिसांनी अटक केली आहे. काही काळापासून फरार असलेल्या चरेगावकरला पकडण्यात पोलिसांना यश आले. या कारवाईमुळे सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.



**सापळा रचून रेगावकरांना अटक**

चरेगावकरांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी सातत्याने प्रयत्न सुरु ठेवले. पोलिसांनी त्याचा दत्तक भाऊन विठ्ठल कुलकर्णीला अटक केली. मंगळवारी रात्री सातारा स्थानिक गुन्हे शाखा आणि आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने कराडजवळील विंग गावात सापळा रचून चारेगावकरांला ताब्यात घेतले.

**११२ कोटींच्या आर्थिक घोटाळ्याचे धागेदोरे कुठपर्यंत?**

अटकेनंतर बुधवारी त्याला कराड येथील न्यायालयात हजर केले. सरकारी पक्षाचा युक्तिवाद आणि प्रकरण लक्षात घेऊन न्यायालयाने शेखर चरेगावकरला सोमवारपर्यंत पोलीस कोठडीचे आदेश देण्यात आले. ११२ कोटींच्या आर्थिक घोटाळ्याचे धागेदोरे कुठपर्यंत पसरलेत यात आणखी कोणाचा हात आहे, याचा पोलीस तपास करत आहेत.

**चोरगावकरांच्या बंगल्यावर आणि यशवंत बँकेच्या फलटण शाखेत ईडीचे छापे**

यशवंत बँकेत तब्बल 112 कोटी रुपयांहून अधिक रकमेची अफरातफर केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला. या प्रकरणी 12 ऑक्टोबर 2025 रोजी कराड शहर पोलीस ठाण्यात सुमारे 50 हून अधिकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. गुन्हा दाखल केल्यापासून चरेगावकर फरार होते, पोलिसांनी त्यांचा तपास केला. दरम्यान, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन ईडीने देखील चरेगावकर यांच्या बंगल्यावर आणि यशवंत बँकेच्या फलटण शाखेत छापे टाकले.

## अन्न आणि औषध प्रशासन विभागातील नेमकं चाललंय तरी काय?
### ‘त्या’ अधिकाऱ्याची थेट मुख्यमंत्री दरबारी तक्रार


**मुख्यमंत्र्यांकडे नेमकी काय मागणी?**

उल्हास इंगवेले याने मुख्यालय सह आयुक्त (अन्न) हा अतिरिक्त कार्यभार बेकायदेशीरपणे अनेक वर्षे स्वतःच स्वतःकडे घेतला आहे. त्याची चौकशी व्हावी. गेली अनेक वर्षे बदली न होता उल्हास इंगवले एकाच पदावर इतकी वर्षे कसा याची खातेनिहाय चौकशी करून त्यांना पदमुक्त करावे. अशी मागणी अर्जाद्वारे करण्यात आली आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

अन्न आणि औषध विभागातील लाचखोरीचे प्रकरणाची मागील काही दिवसांपासून बरीच चर्चा सुरू आहे. अशावेळी या विभागातील इतर गैरव्यवहारांबाबतही आता जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत. अन्न आणि औषध प्रशासना विभागात ढिसाळ कारवाई कुणामुळे होते? असा सवाल आता विचारला जात आहे. अशातच आता या सगळ्या प्रकरणी एका अर्जाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घालावे अशी मागणी करण्यात आली आहे.

सूरज पडवळकर यांनी एक अर्ज करून आता थेट मुख्यमंत्र्यांनाच या प्रकरणी लक्ष घालण्याचे आवाहन केले आहे. अन्न व औषध विभागातील गैरकारभाराची चर्चा ठळकपणे समोर येत असल्याने या विभागातील



काही अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांना पदावरून बाजूला करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणी उल्हास इंगवले नामक अधिकाऱ्याची तक्रार मुख्यमंत्र्यांकडे देण्यात आलेली आहे. भाजप आमदार श्वेता महाले आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी इंगवलेच्या विरोधात कारवाईची केलेली मागणी आणि सभागृहात विभागीय चौकशीचे दिलेले आश्वासन हवेतच विरले असल्याने विभाग ना काम करू शकतोय ना भेसळ रोखू शकतोय अशी भावना व्यक्त होत असून एकाच पदावर वर्षानुवर्षे चिकटून राहणाऱ्या या अधिकाऱ्यावर इतकी मेहेरनजर का? असा थेट सवाल आता उपस्थित झालाय.

मुख्यमंत्र्यांना देण्यात आलेल्या निवेदनामध्ये इतरही काही बाबी ठळकपणे मांडण्यात आल्या आहेत. अन्न आणि औषध विभागाचे अधिकारी उल्हास इंगवले हाच प्रतिबंधित गुटख्याच्या विक्रीत असल्याचा आक्षेपही यावेळी घेण्यात आला आहे.

उल्हास इंगवले याच्या संपत्तीची आणि कारभाराची चौकशी करण्याची भाजपा आमदार श्वेता महाले यांची मागणी अद्यापही दुर्लक्षित का? असा सवालही विचारण्यात आला आहे.

## सोलापूरमधील तरुणाई माव्याच्या विळख्यात...
### नागरिकांकडून कॅन्सरचं विष पसरवणाऱ्यांवर कारवाईची मागणी

■मुंबई। प्रतिनिधी,

सोलापूर मधून एक धक्कादायक बाब समोर आली आहे. राज्यात एकीकडे गुटखा विक्रीवर बंदी असताना सोलापुरात चौका-चौकांतील टपऱ्यांमध्ये मावा अगदी सहज विकत मिळतोय. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील महाविद्यालयीन तरुणाई या माव्याच्या व्यसनाच्या विळख्यत सापडले आहेत. ज्याला या माव्याचं व्यसन जडलं तो तरुण दिवसाला या माव्याची कमीत कमी दोन ते तीन पाकीटं सहज फस्त करतो. आणि जर त्याला मावा मिळाला नाही तर त्याचा जीव कासावीस होतो. त्यामुळे तरुणांमध्ये हे कॅन्सरचं विष पसरवणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केलीये.




**माव्यामुळे जिल्ह्यातील एक तरुण कॅन्सरच्या विळख्यात**

या माव्यामुळे सोलापुरातील एका तरुणाला कॅन्सर झाला. उपचार घेतल्यानं तो मृत्यूच्या दाढेतून बाहेर आलाय. आता तो इतर तरुणांना या माव्यापासून दूर राहण्याचा सल्ला देतोय. किक बसण्यासाठी माव्यात घातक पदाथार्चा वापर केला जातो. हा मावा निकृष्ट दर्जाच्या सुपारीपासून बनवला जातो. मावा तयार करताना त्यात चुना, कात, पाणी तसंच विशिष्ट प्रकारचं द्रव्य वापरलं जातं. अनेक जण तर या माव्याचं व्यसन लागावं यासाठी त्यात गांजाचं पाणीही वापरतात. या माव्यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेटसारखे घातक घटक असतात जे कॅन्सरला आमंत्रण देतात. त्यामुळे असल्या घातक व्यसनांपासून चार हात लांब राहा असा सल्ला डॉक्टरांनीही दिलाय.

**नागरिकांकडून मावा विक्रीवर कारवाई करण्याची मागणी**

मावा विक्रेत्यांची आता फ्रँचायझी देण्यास सुरूवात केलीये. त्यामुळे सोलापुरची ओळख आता माव्याचा जिल्हा म्हणून बनली आहे. मावा विक्रीतून रोज लाखोंची उलाढाल होतीये. अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने याकडे दुर्लक्ष होत आहे. तर काही ठिकाणी चिरीमिरी कारवाई होते. त्यानंतर पुन्हा परिस्थिती जैसे थेच होते. त्यामुळे गुटखा, मावा विक्रीवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरू लागलीये.

**माव्याचे सेवन ठरते तोंडाच्या कॅन्सरसाठी खुले निमंत्रण**

मावाच्या सेवनामुळे प्रामुख्याने तोंड, जीभ, घसा आणि अन्ननलिकेचा कॅन्सर होतो. यात असलेल्या तंबाखूमुळे पेशींचे नुकसान होते, जे तोंडाचा कॅन्सर आणि इतर गंभीर कॅन्सरसाठी खुले निमंत्रण ठरते. तंबाखूमध्ये कासीनीजेन्स नावाची हानिकारक रसायने असतात, ज्यामुळे कर्करोग होतो. तंबाखूच्या धूरात ७० पेक्षा अधिक प्रकारची कर्करोग निर्माण करणारी रसायने असतात, ज्यामध्ये प्रामुख्याने नायट्रोसामाइन्स, टार, बेंझिन, आर्सेनिक, निकेल आणि पोलोनियम-२१० यांसारखे किरणोत्सर्गी घटकांचा समावेश असतो. यामुळे कॅन्सरचा धोका टाळण्यासाठी मवा किंवा कोणत्याही प्रकारचे तंबाखूचे सेवन करणे टाळले पाहिजे.

## आधी झाडाखाली, नंतर ढाब्यावर... ५ जणांकडून भोळसर महिलेवर सामूहिक अत्याचार!
### न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

■जालना। प्रतिनिधी,

जालन्यात भोळसर महिलेवर सामूहिक अत्याचार प्रकरणी पाच आरोपींना २० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. जालना येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. वृत्तानुसार, २८ जुलै २०२२ रोजी आरोपीने पीडितेला मोटारसायकलवर बसवून 'सिल्लोडला घेऊन जातो' असं सांगून दाभाडी येथे एका लिंबाच्या झाडाखाली नेलं आणि





तिच्याशी बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर तिला दाभाडी येथील मुस्कान नईम मिर्झा यांच्या मालकीच्या ढाब्यावर नेण्यात आलं. तेथे शटरच्या आतील खोलीत ५ जणांनी पीडिता नकार देत असतानाही तिच्यावर आळीपाळीने अत्याचार केले. यानंतर पीडितेला पुन्हा टेंभुर्णी बसस्थानकावर सोडण्यात आलं. घरी आल्यानंतर तिने संपूर्ण घटना पतीला सांगितली.

संदीप कारभारी कोल्हे (वय २२ वर्षे), सुंदरराव किसनराव कोल्हे (वय ४० वर्षे), दत्तू कुशाभाऊ खमाटे (वय ६० वर्षे), बाबासाहेब संतोष कोल्हे (वय ३४ वर्षे) आणि लक्ष्मण बाबुराव सोरमार (वय ३४ वर्षे) अशी शिक्षा सुनावण्यात आलेल्या पाचही आरोपींची नावे आहेत. सर्व आरोपींना २० वर्षे सक्तमजुरी, ६० हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

**पतीने पोलीस ठाण्यात दाखल केली तक्रार**

पीडितेने तिच्यासोबत घडलेल्या भयानक घटनेबद्दल सांगितलं असता तिच्या पतीने बदनापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा र. नं. ४४५/२०२२ कलम ३७६, ३७६(ड) भादवी प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलं. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण ९ साक्षीदार तपासण्यात आले. तसेच, तपासादरम्यान पीडितेची मानसोपचार तज्ज्ञांकडून तपासणी करण्यात आली. त्या अहवालानुसार पीडिता मनोविकृतीच्या आजाराने पीडित असली, तरी ती ऐकणे व बोलणे या बाबतीत सक्षम असून तिचा बुद्ध्यांक ९५ असल्याचं निष्पन्न झालं. त्यामुळे ती न्यायालयासमोर शपथेवर साक्ष देण्यास सक्षम असल्याचे स्पष्ट झालं. तिने व फियार्दीने न्यायालयात सर्व आरोपींची ओळख पटवली. सरकार पक्षाचा साक्षीपुरावा व दोन्ही बाजूंचा युक्तिवाद लक्षात घेऊन जालना येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश कृपेश विजय मोरे यांनी बदनापूर पोलीस ठाणे गु.र. नं. ४४५/२०२२ कलम ३७६(ड) भादवी अंतर्गत सर्व आरोपींना प्रत्येकी २० वर्षे सक्तमजुरी व ६० हजार रुपये दंड, तसेच दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच कलम ३७६ भादवी अंतर्गत आरोपी क्रमांक १ संदीप कारभारी कोल्हे यास स्वतंत्रपणे २० वर्षे सक्तमजुरी व ६० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

## कल्याण रेल्वे स्थानकावर लोकलमध्ये महिलांनी एकमेकींच्या उपटल्या झिंज्या... व्हिडिओ होतोय व्हायरल

■नागपूर। प्रतिनिधी,

मुंबई आणि मुंबई उपनगरांतील राहणाऱ्यांसाठी लोकल म्हणजे रोजच्या जीवनातील एक अविभाज्य घटक आहे. याच लोकलने प्रवास करताना मारहाणीच्या अनेक घटना सातत्याने घडू लागल्या आहेत. अशातच कल्याण स्थानकावर काही महिला एकमेकींच्या झिंज्या ओढताना दिसत आहेत, त्यांचा व्हिडिओ जोरात व्हायरल होत आहे.

**कल्याण रेल्वे स्थानकावर महिलांची तुफान हाणामारी**

मिळालेल्या माहितीनुसार, लोकल स्थानकावरून सुटताना संबंधित एक महिला रेल्वेत चढताना तिच्यावर काही लोकांनी हल्ला केल्याचा आरोप आहे. महिलांनी



पीडितेचे केस ओढत मारहाण केली, तसेच जबरदस्ती डब्यातून खाली उतरवण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.

**व्हिडिओत नेमकं काय?**

संबंधित सर्व प्रकरण एका व्हिडिओत कैद करण्यात आल्याचे वृत्त आहे. काही प्रवाशांनी घटनेचा थरार सीसीटीव्हीत कैद केला आहे. व्हिडिओत काही महिला या दादागिरी करताना दिसत आहेत. घटनेनंतर रेल्वे प्रशासन आणि पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

या घटनेनं महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. रोजच्या वाढत्या लोकसंख्येमुळे रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये देखील वाढ होऊ लागली आहे. यामुळे अशा घटना घडू लागली आहे. या प्रकरणी संबंधित महिलांविरुद्ध कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## संपादकीय



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# यांना फाशी द्या!



'पोलीस भ्रष्ट आहेत का?', असे शेंबड्या पोराला झोपेतून उठवून विचारले, तरी तो 'हो' म्हणूनच सांगेल. त्याला कोणताही विचार करावा लागणार नाही, अशीच पोलिसांची प्रतिमा या देशात आहे. 'याला कारण पोलीसच आहेत', हे वेगळे सांगायला नको. 'चांगले पोलीसही असतात', असेही अनुभव अनेकांना असणार, यात शंका नाही; मात्र त्यांचे प्रमाण किती असणार किंवा एखाद्या प्रसंगात एखादा पोलीस चांगला वागला असेलही; मात्र अन्यत्र त्याने काय दिवे लावले असतील, हेही पहावे लागेल. काही जण म्हणतात की, पोलीस खात्यात गेल्यावर तेथील भ्रष्ट पद्धतीत कुणीही प्रामाणिक राहू शकणार नाही. जर तो प्रामाणिक असेल, तर त्यालाही भ्रष्ट केले जाते आणि नाईलाजाने त्याला त्याच पद्धतीचा एक भाग व्हावा लागतो. 'पोलिसांना राजकारण्यांच्या दाबावामुळेही भ्रष्टाचार करावा लागतो', असे नेहमीच सांगितले जाते; मात्र पोलिसांना कायद्याने इतके अधिकार दिले आहेत की, एखादा खमका पोलीस अधिकारी या राजकारण्यांना सरळ करू शकतो; मात्र असा मायेचा पूत अद्याप तरी दिसून आलेला नाही. 'याच कारणामुळे जनतेच्या मनात पोलिसांविषयी तितकेसे प्रेम किंवा आपुलकी नाही', असे म्हटले जाते आणि 'ते चुकीचे आहे', असेही म्हणता येत नाही. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांना बार, अवैध धंदे आदींकडून खंडणी वसूल करण्यास सांगितल्याचा आरोप झाला होता. 'एखाद्या शहराचा पोलीस आयुक्त व्हायचे असल्यास त्याला अमुक एक रक्कम प्रतिमहा सरकारकडे पोचवावी लागते', अशी चर्चा जनतेत आहे. 'सरकार अशा प्रकारे विविध खात्यांतून हप्ताखोरी करत असते आणि म्हणून प्रशासकीय अधिकारी, पोलीस यांना भ्रष्टाचार करावा लागतो', असे म्हटले जाते. 'जसे पोलिसांचे आहे, तसे मंत्री आणि मुख्यमंत्री यांचेही असते', अशी चर्चा नेहमीच केली जाते. माजी क्रिकेटपटू आणि काँग्रेसचे नेते राहिलेले नवज्योत सिद्धू यांच्या पत्नी अन् काँग्रेसच्या नेत्या नवज्योत कौर यांनी काही महिन्यांपूर्वी आरोप केला होता की, पंजाबचा मुख्यमंत्री होण्यासाठी त्यांच्या पतीकडे ५०० कोटी रुपये पक्षाने मागितले होते. आता हा आरोप खरा कि खोटा हे स्पष्ट झालेले नाही; मात्र 'असे काहीतरी चालते', याची चर्चा समाजात होती. 'ती या आरोपातून काही प्रमाणात खरी असू शकेल', असे जनतेला वाटू लागले. त्यात सध्या तेलंगाणाच्या काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांनी पक्षाच्या बैठकीत 'गांधी परिवाराला १ सहस्र कोटी रुपयांची आवश्यकता असल्यास आपण ते जमा करू', असे म्हटल्याचे समोर आल्यावर अशा प्रकारे पैसे गोळा करून पक्षाला दिले जातात, असे पुन्हा चर्चेला आले. कोणताही राजकीय पक्ष चालवायचा, तर पैसा हवा; मग असा पैसा चांगल्या मार्गाने कधीच मिळत नाही. त्यामुळे प्रत्येक पक्षावर भ्रष्टाचाराचा आरोप होत असतो; पण सगळे एकाच माळेचे मणी असल्याने कुणी आरोप तडीस नेऊन सोक्षमोक्ष लावत नाही. अजित पवार यांच्यावर ७० सहस्र कोटी रुपयांच्या सिंचन घोटाळ्याचा आरोप झाला. पुढे काय झाले, हा इतिहास वेगळा सांगायला नको. हीच सध्याची स्थिती आहे. पोलीस गुंडांकडून हप्ते घेतात, हे उघड आहे. 'एखाद्या ठिकाणी धाड घालून सापडलेल्या संपत्तीपैकी काही संपत्ती गिळंकृत करतात', असाही आरोप होत असतो. त्यात जप्त केलेला माल परस्पर विकून स्वतः गुंडांचे 'कार्य' पोलीस करतात, असेही दिसून येते. महाराष्ट्रात अमली पदार्थ तस्करांकडून पकडण्यात आलेले अमली पदार्थ संबंधित पोलिसांनी विकून त्याचे कोट्यवधी रुपये खाल्ल्याचे समोर आल्यानंतर २५ पोलिसांना बडतर्फ करण्यात आले आहे. 'पोलीस कुठल्या थराला गेलेले आहेत', हेच यातून लक्षात येते. उत्तरप्रदेशामध्ये तर पकडलेला अमली पदार्थाचा साठा उंदरांनी खाऊन टाकल्याची लोणकढी थाप न्यायालयासमोर मारणारेही पोलीस या देशात आहेत. 'कोळसा उगाळावा तितका काळा असतो', असे म्हटले जाते, तसेच पोलिसांच्या भ्रष्टाचाराविषयी बोलावे तितके अल्प होईल. आता 'याला कोण उत्तरदायी आहे?', असे जर म्हटले, तर 'यथा राजा तथा प्रजा' असेच म्हणावे लागते. आज देशातील सर्वपक्षीय बहुतांश राजकारणी हे भ्रष्ट आहेत, असेच चित्र आहे. सर्वपक्षीय सरकारे भ्रष्ट असल्याने पोलीस भ्रष्ट झाले, तर आश्चर्य काय! म्हणजेच जर पोलिसांना भ्रष्टाचारमुक्त बनवायचे असेल, तर प्रथम राजकारण्यांना सरळ करणे किंवा सरळमार्गी राजकारण्यांना तेथे बसवणे आवश्यक आहे. 'असे करणे आताच्या व्यवस्थेमध्ये शक्य नाही', हे जनतेलाही वाटते; कारण अशी प्रामाणिक व्यक्ती त्या पदापर्यंत पोचणेच सध्याच्या व्यवस्थेमध्ये शक्य नाही, ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे पोलीस भ्रष्टाचार करत रहाणार आणि जनतेला मुकाटपणे ते पहावे लागणार, याला पर्याय नाही. काही प्रमाणात अशा भ्रष्टाचाराला चाप लावायचा असेल, तर तो न्यायालयाच्या आणि सध्याच्या कायद्यांद्वारे लावायला हवा, असे वाटेल. तसा प्रयत्न असतो; मात्र न्यायव्यवस्था इतकी कूर्मगतीने कार्य करते की, त्याद्वारे खरा न्याय मिळतांना जनतेची दमछाक होते. त्यातही काही पालट करून आणि कठोर शिक्षेचे प्रावधान करून परिस्थितीत काही प्रमाणात तरी पालट करता येऊ शकतो. त्यासाठी प्रत्येक भ्रष्टाचाऱ्याला फाशीचीच शिक्षा करण्याचाच कायदा करणे आता अपेक्षित झाले आहे. भारतात भ्रष्टाचाऱ्याला शिक्षा होत नाही, हे जनतेला लक्षात आल्याने ती अशा गोष्टींना विरोध न करता त्या पद्धतीचा एक भाग बनून आपला कार्यभाग साध्य करून घेते. जर भ्रष्टाचाऱ्यांना फाशी होऊ लागली आणि जनतेत विश्वास निर्माण झाला, तर थोडी आशा आपण बाळगू शकतो. असे म्हटले जाते की, माकडीण पाण्यात बुडू लागली, तर ती आपल्या मुलाला बुडवून स्वतः वाचण्याचा प्रयत्न करते. पोलीस राजकारण्यांमुळे भ्रष्टाचार करत असतील, तर अशांना फाशीची शिक्षा होऊ लागल्यावर ते राजकारण्यांना उघड करण्याचे धाडस करतील आणि स्वतःचा बचाव करतील; पण या देशात हत्या करणाऱ्यांना, जिहादी आतंकवाद्यांना फाशी दिली जात नाही, दिली तर काही वेळा राष्ट्रपती ही शिक्षा जन्मठेपेत परावर्तीत करतात, असेही दिसून येते. त्यामुळे ही गोष्टही अवघडच म्हणावी लागेल. चाणक्यांनी म्हटले आहे की, पाण्यामध्ये असणारा मासा पाणी कधी पितो, हे जसे समजू शकत नाही, तसेच सरकारी अधिकारी, मंत्री भ्रष्टाचार कधी करतात, हे समजणे कठीण असते. आज सर्वत्र उघडपणे भ्रष्टाचार होत असतांनाही कुणी काही करू शकत नाही, ही लज्जास्पद स्थिती आहे. ती पालटण्यासाठी देवालाच शरण जायला हवे!

# मनपा समित्यांत शोभेच्या बाहुल्या नको!

मुंबई महापालिका ही देशातील सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून ओळखली जाते. २०२६ च्या निवडणुकीत मुंबई महापालिका निवडणुकीत २२७ जागांपैकी भाजपने ८९ जागा जिंकल्या, तर एकनाथ शिंदे यांच्या गटाने २९ जागा मिळवल्या, एकूण ११८ जागांसह बहुमत मिळवले. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला ६५ जागा मिळाल्या, तर राज ठाकरे यांना केवळ सहा जागा. या निवडणुकीनंतर विविध समित्यांच्या अध्यक्ष आणि सदस्यांच्या निवडणुका बिनविरोध पार पडल्या. या बिनविरोध निवडणुकीचे श्रेय उद्धव ठाकरे यांना दिले जात आहे, पण हा केवळ दिखावा आहे. प्रत्यक्षात, या समित्या आणि त्यांची अध्यक्षपदे आता केवळ शोभेच्या वस्तू ठरणार आहेत. पूर्वी उद्धव ठाकरे यांचा शिस्तबद्ध अंमल असलेल्या मनपात आता भाजप आणि शिंदे गटातील नेत्यांमध्ये तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. या स्पर्धेमुळे समित्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत असून, आर्थिक कमकुवतपणा आणि निर्माण झालेला गोंधळ यामुळे मुंबईकरांच्या समस्या अधिक जटिल होत चालल्या आहेत.

मुंबई मनपा समित्या या महापालिकेच्या कारभारातील महत्त्वाचा भाग आहेत. मुंबई मनपात एकूण १६ वैधानिक समित्या आहेत, ज्यात स्थायी, शिक्षण, आरोग्य, बेस्ट, प्रभाग समिती इत्यादींचा समावेश आहे. स्थायी समिती ही सर्वात शक्तिशाली समिती आहे, जी पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या प्रस्तावांना मंजुरी देते. शिक्षण समिती शाळा आणि शिक्षणाशी संबंधित धोरणे आखते, तर आरोग्य समिती आरोग्य सेवा आणि रुग्णालयांवर देखरेख ठेवते. बेस्ट कमिटी ही बहन्मुंबई इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट (बेस्ट) उपक्रमाच्या कारभारावर नियंत्रण ठेवते. या समित्यांच्या निवडणुका सामान्यतः सार्वत्रिक निवडणुकीनंतर पार पडतात आणि यंदा त्या बिनविरोध झाल्या. मात्र, या बिनविरोध निवडणुकीचे कारण उद्धव ठाकरे यांच्या राजकीय चातुर्यात असल्याचे सांगितले जाते. महाराष्ट्रात एकूण ६८ उमेदवार बिनविरोध निवडून आले, ज्यात बहुतांश महायुतीचे आहेत.



उद्धव ठाकरे यांचा शिस्तबद्ध अंमल असलेल्या मनपात आता भाजप आणि शिंदे गटातील नेत्यांमध्ये तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. या स्पर्धेमुळे समित्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत असून, मुंबईकरांच्या समस्या अधिक जटिल होत चालल्या आहेत.

पूर्वी मुंबई मनपावर ठाकरे कुटुंबाचा एकछत्री अंमल होता. १९९० पासून शिवसेनेने मुंबई मनपावर वर्चस्व गाजवले, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना मुंबई मनपाच्या कारभाराकडे त्यांचे बारीक आणि थेट लक्ष असायचे. मात्र, २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या भाजपप्रणित बंडखोरीनंतर शिवसेना फुटली आणि मुंबई मनपा निवडणुका रखडल्या. आता, २०२६ च्या निकालानंतर भाजप आणि शिंदे गटातील नेत्यांमध्ये समित्यांच्या अध्यक्षपदांसाठी रस्सीखेच सुरू झाली. यामुळे समित्यांच्या बैठकांमध्ये वाद होणार आणि निर्णय प्रक्रिया मंदावणार हे निश्चित आहे. मुंबई मनपाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केला, तर ती कमकुवत असल्याचे दिसते. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात मुंबई मनपाने ५९ हजार ९५५ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प जाहीर केला, ज्यात भांडवली खचार्साठी ३१ हजार ७७५ कोटी रुपयांची तरतूद होती. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात नवीन प्रकल्पांची घोषणा होण्याची शक्यता कमी आहे, विद्यमान प्रकल्पांवरच भर दिला जाईल. मुंबई मनपाचे उत्पन्न मुख्यतः मालमत्ता कर, पुनर्विकास कर आणि सरकारी अनुदानांवर अवलंबून आहे, पण कोविडनंतरच्या आर्थिक मंदीमुळे उत्पन्न कमी झाले. समित्यांना मिळणारा निधी अत्यल्प आहे; उदाहरणार्थ, प्रभाग समितीला प्रति प्रभाग केवळ एक ते दोन कोटी रुपये मिळतात, जे मुंबईच्या लोकसंख्येच्या तुलनेत अपुरे आहेत. मुंबईची लोकसंख्या सव्वा कोटी आहे आणि प्रति व्यक्ती खर्च फक्त ४० हजार रुपये आहे, जे दिल्ली किंवा बंगळुरूच्या तुलनेत कमी आहे. या कमकुवत आर्थिक परिस्थितीमुळे समित्या प्रभावीपणे काम करू शकत नाहीत. स्थायी समितीला पाच कोटींपेक्षा अधिक खर्च मंजूर करण्याचा अधिकार आहे, पण निधीची कमतरता असल्याने अनेक प्रस्ताव रखडतात.

### बेस्ट उपक्रमाची आर्थिक समस्या

बेस्ट उपक्रमाची आर्थिक समस्या ही मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी आहे. बृहन्मुंबई इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट (बेस्ट) हा मुंबई महापालिकेचा उपक्रम असून, दररोज सुमारे ३५ ते ४० लाख प्रवासी त्यावर अवलंबून आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांत बेस्टचे आर्थिक नुकसान सतत वाढत आहे, ज्यामुळे त्याची सेवा, बस खरेदी आणि कर्मचारी व्यवस्थापनावर मोठा परिणाम होत आहे. बेस्टच्या आर्थिक स्थितीचे मुख्य आकडे पाहिले तर बेस्टची अखेरची घरघर सहज लक्षात येते. २०२६-२७ साठी बेस्टचा संभाव्य तोटा रु.३,००० कोटींपर्यंत असेल. हे नुकसान मुख्यतः उत्पन्न कमी आणि खर्च जास्त असल्यामुळे आहे. बेस्टचे उत्पन्न तिकीट विक्री, जाहिराती आणि इतर स्रोतांवरून येते. बेस्टने २०२६-२७ पर्यंत पूर्णपणे इलेक्ट्रिक बसकडे जाण्याचे लक्ष्य ठेवले आहे. यासाठी नवीन बस खरेदी, चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर आणि इतर सुधारणांसाठी मोठा निधी लागणार आहे. २०२५-२६ साठी बेस्टने मुंबई मनपाकडून रु.२ हजार १३२ कोटी अनुदान मागितले होते. मुंबई मनपा ही बेस्टची मालक संस्था असल्याने दरवर्षी अनुदान देते. २०२५-२६ च्या मुंबई मनपा अर्थसंकल्पमध्ये रु. एक हजार कोटी अनुदानाची तरतूद. हे अनुदान नसते तर बेस्टची सेवा पूर्णपणे ठप्प होऊ शकते. मात्र, हे अनुदान मुंबई मनपाच्या इतर प्रकल्पांवर (रस्ते, पाणी, शिक्षण) परिणाम करते. बेस्टमध्ये कोविडनंतर प्रवासी संख्या कमी झाली, पण खर्च वाढला. डिझेल दर वाढले, इलेक्ट्रिक बस संक्रमण महाग झाले. जुने कर्मचारी, पेन्शनचा भार यामुळे बेस्टची आर्थिक बाजू कमकुवत होत गेली. आधीच बस संख्या कमी (सध्या नऊ हजारपैकी केवळ ७०% सुरू), त्यात अपघात वाढले (गेल्या ५ वर्षांत ८३४ अपघात, ८८ मृत्यू, रु.४२.४० कोटी भरपाई), त्यामुळे सेवा गुणवत्ता कमी होत गेली आणि प्रवाशांनी पयार्यी मार्ग स्वीकारले. बेस्टला टिकवण्यासाठी कमी अंतरासाठी कमी भाडे, जास्त अंतरासाठी वाढ करणे, जाहिरात आणि इतर उत्पन्न स्रोत वाढवणे, खासगी भागीदारी कमी करणे, इलेक्ट्रिक बससाठी केंद्र-राज्य अनुदान घेणे, बेस्टला पूर्णपणे मुंबई मनपामध्ये विलीन करणे. जेणेकरून प्रशासन एकत्र येईल अशा काही सूचना आहेत. बेस्ट ही मुंबईची 'जीवनवाहिनी' आहे, पण सध्याची आर्थिक समस्या गंभीर आहे. अनुदान आणि सुधारणा न झाल्यास, २०२६-२७ मध्ये तोटा रु.३ हजार कोटींवर जाऊ शकतो. मुंबईकरांना स्वस्त आणि विश्वसनीय सार्वजनिक वाहतूक हवी आहे, पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि दीर्घकालीन योजना आवश्यक आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या नितीन नांदगावकर यांच्यासारख्या आक्रमक नेत्यांना बेस्ट समितीमध्ये नेमले आहे. बेस्ट हा मुंबई मनपाचा एक भाग आहे, जो मुंबईच्या सार्वजनिक वाहतुकीचे व्यवस्थापन करतो. बेस्टची आर्थिक स्थिती अत्यंत कमकुवत आहे; २०२४ मध्ये बेस्टला एक हजार कोटी रुपयांचा तोटा झाला, बेस्टला सतत मुंबई मनपाकडून अनुदान मिळवावं लागतं. उद्धव ठाकरे यांचे निष्ठावान आणि आक्रमक नेते, जसे की नांदगावकरांसारखे, बेस्ट कमिटीमध्ये पाठवले आहेत. हे नेते कामगार संघटना आणि विरोधकांवर दबाव टाकण्यासाठी ओळखले जातात. यामुळे बेस्टमध्ये कामगार हिताचे वातावरण निर्माण झाले आहे. बेस्टच्या ४० हजार कर्मचाऱ्यांना नितीन नांदगावकर यांच्यामुळे दिलासा मिळाला आहे आणि त्याचा उत्पादकतेवर चांगला परिणाम झाला.

### गोंधळात गोंधळ महायुतीचा

महायुतीच्या गोंधळात गोंधळामुळे मुंबईच्या विकासकामांवर परिणाम होत आहे. रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन यासारख्या मूलभूत समस्या सोडवल्या जात नाहीत. मुंबईत दरवर्षी पाच हजार किलोमीटर रस्ते दुरुस्त केले जाणार होते, पण केवळ २०% दुरुस्त होतात आणि पावसाळ्यात खड्डे वाढतात. मुंबई मनपाच्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पामध्ये ७४ हजार ४२७ कोटी रुपयांची तरतूद आहे, पण या निधीचा योग्य वापर होत नाही. अनियोजित खर्च आणि भ्रष्टाचारामुळे मुंबईकरांना फटका बसतो. या गोंधळाचे विश्लेषण करताना, राजकीय स्थैर्याची गरज दिसते. पूर्वी ठाकरे यांचा एकछत्री अंमल असल्याने निर्णय जलद होत असत, पण आता बहुपक्षीय टक्करमुळे ते शक्य नाही. भाजप आणि शिंदे गटातील नेत्यांमध्ये ४०% नेते मुंबईबाहेरील आहेत, ज्यामुळे स्थानिक मुद्द्यांकडे दुर्लक्ष होते. उद्धव ठाकरे यांच्या धोरणांमुळे पक्षांतर्गत दहशत निर्माण झाली, ज्याचा परिणाम मुंबई मनपाच्या कारभारावर झाला. या गोंधळावर नियंत्रण मिळवले नाही तर मुंबईच्या विकासाला ब्रेक लागेल.


# दहशतीचा 'नापाक' संकर



दिल्लीमध्ये उघडकीस आलेला दहशतवादी हल्ल्याचा कट म्हणजे पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादाचे शेपूट अजूनही वळवळतेच असल्याचे निदर्शक आहे. दिल्लीतील भीषण स्फोटात १३ नागरिकांचे बळी जाण्याच्या घटनेस तीन महिने होत आहेत; त्याच वेळी फरिदाबाद आणि जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचे मोड्यूल उघडकीस आले आणि मोठ्या प्रमाणात स्फोटकांचा साठाही जप्त करण्यात आला. त्या पार्श्वभूमीवर नवा कट तपास यंत्रणांनी उधळून लावला. यात अटक केलेले बांगलादेशी नागरिक असल्याने पाकिस्तानी 'आयएसआय' आणि बांगलादेशातील भारतविरोधी प्रवृत्तींचा संकर ही भारताची नवी डोकेदुखी ठरू शकते. त्या पार्श्वभूमीवर भारतात धार्मिक स्थळांच्या परिसरात घातपाती कारवाया करण्याचा पाकिस्तान्यांचा कावा दिसतो. या प्रकरणात तमिळनाडूमधून काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले; तसेच पश्चिम बंगालमध्येसुद्धा याचे धागेदोरे आढळले आहेत. गेल्या वर्षी पहलगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवले आणि 'लष्कर ए तय्यबा' व 'जैश ए महंमद' या दहशतवादी संघटनांचे तळ उद्ध्वस्त करून पाकिस्तानला धडा शिकवला. त्यानंतर बांगलादेशातील अस्वस्थतेचा फायदा घेऊन तेथेही भारतविरोधी भावना भडकावण्याचे पाकिस्तानचे उद्योग सुरू आहेत. आता बांगलादेशात सत्तारूढ झालेल्या नव्या सरकारने पूर्वीप्रमाणे नसले, तरी भारताशी चांगले संबंध ठेवण्याचे सूतोवाच केले आहे. मात्र, पाकिस्तान त्यात आडकाठी आणण्याचा प्रयत्न करणार आणि अशा पद्धतीच्या घातपाती कारवायांना फूस देणार, असेच दिसते. एकीकडे पाकिस्तान स्वतः दहशतवादी कारवायांना तोंड देत आहे.

# एपस्टीन फाईल्स आणि लोकशाहीची कसोटी!

एपस्टीन प्रकरणातून समोर आलेल्या जागतिक नेटवर्क्सच्या संदर्भात पाहिले असता आंतरराष्ट्रीय बँकिंग प्रणाली, करस्वर्गांचा वापर, शेल कंपन्या आणि गुंतागुंतीच्या आर्थिक संरचना लोकशाही व्यवस्थांसाठी किती आव्हानात्मक ठरू शकतात हे स्पष्ट होते, कारण अशा संरचनांमुळे व्यवहार कायदेशीर चौकटीत असले तरी नैतिक आणि सामाजिक परिणामांबाबत पारदर्शकता कमी होते. माध्यमांची भूमिकादेखील या संपूर्ण प्रकरणात निर्णायक ठरते, कारण काही माध्यमांनी सनसनाटीपणा वाढवणारे मथळे देत अप्रमाणित दावे पसरवले.



जागतिक पातळीवर जेफ्री एपस्टीन प्रकरण आणि त्यातून पुढे आलेल्या तथाकथित एपस्टीन फाईल्स या संज्ञेभोवती निर्माण झालेली चर्चा ही केवळ एका गुन्हेगारी प्रकरणापुरती मर्यादित न राहता ती आंतरराष्ट्रीय राजकारण, जागतिक अर्थव्यवस्था, न्यायव्यवस्था, माध्यमांची भूमिका आणि लोकशाहीतील उत्तरदायित्व यांसारख्या मूलभूत मुद्द्यांशी जोडली गेली आहे, असे अनेक निरीक्षक, अभ्यासक आणि पत्रकारांचे मत आहे. कारण जेफ्री एपस्टीन हा अमेरिकेतील एक अतिशय श्रीमंत आणि वजनदार वित्तीय गुंतवणूकदार होता, ज्याच्यावर अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाचे आणि मानवी तस्करीचे अत्यंत गंभीर आरोप होते. या आरोपांमुळे त्याला २००८ मध्ये दोषी ठरवण्यात आले असले तरी त्यावेळी झालेल्या सौम्य शिक्षेमुळे आणि विशेष सवलतींमुळे अमेरिकेतील न्यायव्यवस्थेतील दुहेरी निकषांवर आधीच प्रश्न उपस्थित झाले होते. २०१९ साली न्यूयॉर्कमधील मेट्रोपॉलिटन करेक्शनल सेंटरमध्ये एपस्टीनचा मृत्यू अधिकृतरित्या आत्महत्या म्हणून घोषित करण्यात आला, मात्र त्या मृत्यूच्या वेळी तुरुंगातील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत नसणे, जबाबदार रक्षकांचा निष्काळजीपणा आणि आधी झालेल्या आत्महत्येच्या प्रयत्नानंतरही पुरेशी खबरदारी न घेणे या कारणांमुळे या मृत्यूभोवती संशयाचे सावट निर्माण झाले आणि त्यामुळे हे प्रकरण केवळ न्यायालयीन नव्हे तर सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आले.

एपस्टीनच्या मृत्यूनंतर अमेरिकेच्या न्याय विभागाने, फेडरल न्यायालयांनी आणि संसदीय चौकशी समित्यांनी तपासादरम्यान संकलित केलेली विविध कागदपत्रे हळूहळू सार्वजनिक करण्यास सुरुवात केली, ज्यामध्ये ई-मेल संवाद, संपर्क यादी, आर्थिक व्यवहारांचे तपशील, खासगी विमानांच्या प्रवास नोंदी, मालमत्तांशी संबंधित कागदपत्रे, छायाचित्रे आणि काही प्रमाणात व्हिडिओ पुरावे यांचा समावेश होता, आणि या विस्तृत दस्तऐवजीकरणालाच माध्यमांनी एपस्टीन फाईल्स असे संबोधले. या फाईल्समध्ये विविध देशांतील राजकीय नेते, उद्योगपती, बँकर्स, कायदेशीर सल्लागार आणि इतर प्रभावशाली व्यक्तींचे संदर्भ आढळतात, मात्र कायदेशीर दृष्टीने हे स्पष्ट करणे आवश्यक ठरते की कोणत्याही व्यक्तीचे नाव एखाद्या दस्तऐवजात असणे म्हणजे त्या व्यक्तीवर गुन्हा सिद्ध झाला असा अर्थ होत नाही. कारण दोष सिद्ध होईपर्यंत निर्दोष हा सिद्धांत आंतरराष्ट्रीय कायद्यात आणि लोकशाही व्यवस्थांमध्ये मूलभूत मानला जातो. तरीही, इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रभावशाली व्यक्तींचे संदर्भ एका लैंगिक शोषण प्रकरणाशी जोडले जाणे हे लोकशाही समाजासाठी अस्वस्थ करणारे वास्तव आहे. त्यामुळे नैतिकता, पारदर्शकता आणि सत्ताधार्यांच्या उत्तरदायित्वाबाबत व्यापक चर्चा सुरू झाली. ही चर्चा केवळ अमेरिकेपुरती मर्यादित न राहता जागतिक पातळीवर पसरली. कारण अनेक देशांमध्ये अभ्यासकांनी आणि माध्यमांनी या प्रकरणाकडे जागतिक भांडवली व्यवस्थेतील सत्तेचे केंद्रीकरण, आर्थिक विषमता आणि न्यायव्यवस्थेतील असमतोल या व्यापक चौकटीतून पाहण्यास सुरुवात केली. भारताच्या संदर्भात पाहिले असता, देशाची वाढती जागतिक आर्थिक भूमिका, आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीतील सहभाग आणि परराष्ट्र धोरणातील सक्रियता यामुळे अशा प्रकरणांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित होते.

भारत आज सुमारे ३.७ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था असलेला देश असून जागतिक भांडवली प्रवाहांचा तो एक महत्त्वाचा घटक बनला आहे, मात्र या आर्थिक वाढीचे लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत समान रितीने पोहोचले आहेत का, हा प्रश्न अद्याप कायम आहे. विविध आर्थिक अहवालांनुसार देशातील संपत्तीचे केंद्रीकरण वाढले असून अल्पसंख्य उच्च उत्पन्न गटाकडे मोठ्या प्रमाणावर संपत्ती जमा होत असताना मोठा लोकसमूह असुरक्षित रोजगार, वाढती महागाई आणि सामाजिक सुरक्षेच्या अभावाशी झुंज देत आहे, आणि अशा परिस्थितीत जागतिक स्तरावरील सत्ता-संबंध आणि आर्थिक नेटवर्क्सबाबत पारदर्शक चर्चा होणे लोकशाहीदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे ठरते. सोशल मीडियाच्या युगात या प्रकरणाशी संबंधित अपुरी माहिती, अर्धसत्य, चुकीचे दावे आणि कट-सिद्धांत वेगाने पसरले, काही व्हिडिओ क्लिप्स किंवा दस्तऐवज चुकीच्या संदर्भात मांडले गेले किंवा संपादित स्वरूपात प्रसारित झाले, ज्यामुळे सामान्य नागरिकांसाठी सत्य आणि असत्य यामधील फरक ओळखणे अधिक कठीण झाले. त्यामुळेच अधिकृत दस्तऐवज, न्यायालयीन नोंदी आणि विश्वासार्ह पत्रकारितेवर आधारित विश्लेषणाचे महत्त्व अधोरेखित झाले. या पार्श्वभूमीवर अनेक अभ्यासकांनी असा मुद्दा मांडला की एपस्टीन फाईल्स या केवळ गुन्हेगारी तपासाशी संबंधित नसून त्या आधुनिक जागतिक व्यवस्थेतील सत्ता, पैसा आणि उत्तरदायित्व यांच्यातील असमतोल उघड करणारा दस्तऐवजी आरसा आहेत. कारण या प्रकरणातून असे दिसून येते की आर्थिक सामर्थ्य आणि राजकीय प्रभाव असलेल्या व्यक्तींना कायदेशीर प्रक्रियेचा सामना सामान्य नागरिकांपेक्षा वेगळ्या पद्धतीने करावा लागतो. तपास प्रक्रियेत विलंब होतो, माहितीवर मयार्दा येतात आणि अनेक प्रकरणे अंतिम न्यायालयीन निर्णयापर्यंत पोहोचतच नाहीत.

अमेरिकेतील या प्रकरणावरूनच जागतिक स्तरावर एलिट अकाउंटेबिलिटी म्हणजेच उच्चभ्रू वर्गाच्या उत्तरदायित्वाचा प्रश्न पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे. कारण लोकशाही व्यवस्थांमध्ये कायद्याचे राज्य सर्वांसाठी समान असावे ही अपेक्षा अशा प्रकरणांमुळे डळमळीत होत असल्याचे अनेकांना वाटते. भारतासारख्या देशासाठी हा मुद्दा विशेष महत्त्वाचा ठरतो, कारण भारत स्वतःला जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून सादर करतो आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पारदर्शकता, कायद्याचे राज्य आणि नैतिक शासन यांची भूमिका घेतो, मात्र देशांतर्गत पातळीवर आर्थिक विषमता, कॉर्पोरेट आणि राज्यसत्तेतील संबंध, धोरणनिर्मितीतील प्रभाव आणि नियामक स्वायत्तता यांबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. गेल्या दशकात भारताने जागतिक गुंतवणुकीसाठी आपले दरवाजे मोठ्या प्रमाणावर खुले केले, पायाभूत सुविधा, ऊर्जा, दूरसंचार आणि वित्तीय क्षेत्रात खासगी भांडवल आकर्षित केले, परंतु या प्रक्रियेत सार्वजनिक उत्तरदायित्व, सामाजिक परिणाम आणि दीर्घकालीन समतोल विकास यावर पुरेशी सार्वजनिक चर्चा झाली का, हा प्रश्न अद्यापही महत्त्वाचा आहे.

एपस्टीन प्रकरणातून समोर आलेल्या जागतिक नेटवर्क्सच्या संदर्भात पाहिले असता आंतरराष्ट्रीय बँकिंग प्रणाली, करस्वर्गांचा वापर, शेल कंपन्या आणि गुंतागुंतीच्या आर्थिक संरचना लोकशाही व्यवस्थांसाठी किती आव्हानात्मक ठरू शकतात हे स्पष्ट होते, कारण अशा संरचनांमुळे व्यवहार कायदेशीर चौकटीत असले तरी नैतिक आणि सामाजिक परिणामांबाबत पारदर्शकता कमी होते. माध्यमांची भूमिकादेखील या संपूर्ण प्रकरणात निर्णायक ठरते, कारण काही माध्यमांनी सनसनाटीपणा वाढवणारे मथळे देत अप्रमाणित दावे पसरवले. तर काही माध्यमांनी तथ्यांची पडताळणी, कायदेशीर मयार्दा आणि संतुलित भाषा यांचा आधार घेत अधिक जबाबदार भूमिका बजावली, आणि या दोन्ही प्रवृत्तींचा परिणाम सार्वजनिक चर्चेच्या गुणवत्तेवर स्पष्टपणे दिसून आला. या सगळ्या चचेर्चा निष्कर्ष असा काढला जातो की लोकशाही व्यवस्थांमध्ये केवळ निवडणुका आणि सत्तांतर पुरेसे नसून सत्तेच्या प्रत्येक स्तरावर उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि नैतिक निकषांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. अन्यथा पैसा आणि प्रभाव यांच्या जोरावर कायद्याच्या चौकटीबाहेर वावरण्याची प्रवृत्ती अधिक बळावते, आणि त्यामुळे एपस्टीन फाईल्स हे प्रकरण एकाच वेळी गुन्हेगारी तपास, न्यायव्यवस्थेची कसोटी, माध्यमांची जबाबदारी आणि लोकशाहीतील नैतिकतेचा आरसा ठरते, ज्यातून धडा घेत शांतपणे, तथ्यांच्या आधारे आणि कायदेशीर चौकटीतून चर्चा करणे हेच दीर्घकालीन लोकशाही आरोग्यासाठी आवश्यक ठरते.

सत्ता आणि प्रचंड पैसा यामुळे माणसामध्ये अतिरेकी आत्मविश्वास बळावतो, आपण कुठलेही कायदे वाकवू शकतो, प्रसंगी न्याय विकत घेऊ शकतो, असे त्याला वाटू लागते. त्यात पुन्हा ज्यांच्याकडे सत्तेची ताकद आहे, तसेच पैसा ओतण्याची तयारी आहे, त्यांच्यासाठी त्यांनी केलेले गुन्हे झाकण्यासाठी वकिलांची फौज तयार असते. गुन्हे कसे लांबणीवर टाकायचे, त्यांना विविध वळणे देऊन त्यांच्यातील तीव्रता कशी कमी करायची म्हणजे आरोपींना शिक्षा झालीच तर ती नगन्य असेल. यासाठी शेकडो वकील रात्रंदिवस राबवले जात असतात. त्यात पुन्हा गुन्हा करणारे मोठ्या उद्योगांचे प्रमुख असतील तर त्यांच्यावर कारवाई झाली तर अनेक लोक बेरोजगार होऊ शकतात, अनेकांच्या पोटापाण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, त्यामुळे त्या श्रीमंताचे अपराध झाकले जातात. त्याच्या आरोपांकडे दुर्लक्ष केले जाते. मोठा मासा हा जाळे तोडून जातो आणि लहान मासे जाळ्यात अडकतात. सेलिब्रिटींना त्यांच्याकडे असलेल्या ताकदीमुळे कायद्याचे गज वाकवून आपली सुटका करता येते. सामान्य माणूस वर्षानुवर्षे गजांमागे सडत राहतो. त्यामुळे अशा स्थितीत लोकशाही शासन प्रणालीची खरोखरच कसोटी लागत असते.

# बियरचा वापर केल्याने केस होतात सिल्की आणि शाईन

**सुंदर केस एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात अधिक भार टाकतात. मग तो पुरुष असो की महिला. सर्वांनाच आपल्या केसांना शाइनी आणि सिल्की ठेवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारांच्या प्रॉडक्ट्सचा वापर करावा लागतो, पण या प्रॉडक्ट्समुळे केसांना नुकसान होण्याची भीती सदैव असते. म्हणून घरगुती कंडिशनरच केसांसाठी उत्तम असतात. म्हणून जाणून घेऊ अशा काही घरगुती कंडिशनर्सबद्दल...**

■ एक कप बियरला एखाद्या भांड्यात तोपर्यंत गरम करा जोपर्यंत त्याचे प्रमाण अर्धे राहत नाही. गरम केल्याने बियरमधील अल्कोहोल वाफ बनून उडून जाते. आता याला गार होऊ द्या, नंतर यात आपल्या पसंतीचा शॅम्पू मिसळून द्या, लक्षात ठेवण्यासारखे म्हणजे ज्या शॅम्पूचा वापर करत असाल तो एकाच ब्रँडचा असायला पाहिजे. या घोळला एका बाटलीत भरून ठेवा. जेव्हा कधी केस धुवायचे असतील याने केस धुवा, यामुळे राठ केसांमध्ये देखील निखर येईल. केस चमकदार आणि सुंदर दिसतील.



■ केळी केसांसाठी फारच उत्तम मानण्यात आले आहे. केळींची पेस्ट तयार करून त्यात काही थेंब मधाचे टाकून ही पेस्ट ३० मिनिटांपर्यंत केसांवर लावून ठेवावी. नंतर गार पाण्याने केस धुवून टाकावे.

■ आपल्या केसांना शॅम्पूने धुतल्यानंतर बियरचे काही थेंब पाण्यात घालून त्या पाण्याने एकदा परत केस धुवून टाकावे. नंतर स्वच्छ पाण्याचे धुवावे. बियरमुळे तुमच्या केसांमध्ये चमक येईल आणि ते प्राकृतिकरीत्या मजबूत होतील.

■ केसांना शाईनी बनवण्यासाठी दह्यात शॅम्पू घालून आधीपासून लावून ठेवावे. डोक्यात जर कोंडा असेल तर काही थेंब लिंबाचा रस त्यात घालून केसांना लावावे. वर दिलेले हे उपाय केल्याने नक्कीच फायदा होईल.

**प्रत्येकाला आपलं वजन कमी झालं पाहिजे अशी तीव्र इच्छा असते. यासाठी सगळे उपाय करण्यासाठी आपण तयार असतो.**

# शरीरातील कॅलरी कमी करण्यासाठी हे करा...

**अनेक** प्रयत्न करूनसुद्धा वजन कमी करण्याबाबत आपण अपयशी ठरतो. जास्त कष्ट न घेता आपण घरगुती उपाय करून शरीरातील जास्त कॅलरी कमी करू शकतो.


**घरबसल्या हे सोपे उपाय करा..**

■ फळ रस पिण्याऐवजी जास्त फळे खा. फळांमध्ये फायबर आणि साखरेचे संतुलित प्रमाण असते यामुळे कॅलरी वाढत नाहीत.

■ पालेभाज्या आणि फळभाज्यांचा आहारात जास्तीत जास्त समावेश करा. मांसाहारी जेवण होईल तेवढं टाळण्याचा प्रयत्न करा.

■ घाईघाईत जेवू नये जेवण चावून खा त्याने शरीरातील कॅलरीज कमी होतात.

■ योग्य तेवढी झोप पूर्ण घ्या त्यामुळे कॅलरी वाढण्याचे प्रमाण कमी होते.



# आरोग्याचा स्रोत – जिरा पाणी

**सकाळी** उपाशीपोटी पाणी पिणे किंवा तांब्याच्या भांड्यात साठवलेले पाणी पिणे म्हणजे आरोग्याचे वरदान हे आपण बरेचदा वाचलेले आहे. परंतु याच पद्धतीने दिवसभरात कधीतरी एक ग्लासभर



जिरा पाणी प्राशन केले तर आरोग्याला खूप मदत होते. जिरा पाण्यामुळे शरीरात पाचकद्रव्ये मोठ्या प्रमाणावर तयार होतात आणि पचन क्रियेला गती मिळते. पोटाच्या विकारावर जिरा पाण्याचा उपयोग होतो. प्यायलेले पाणी शरीराला उपयोगी पडतेच असे नाही. परंतु जिरा पाणी प्राशन केल्याने तेही रात्री झोपताना प्राशन केल्याने दिवसभरात प्यायलेले पाणी उपयोगी पडायला लागते. जिरा पाण्यात पोटॅशियम असते आणि त्यामुळे रोग प्रतिकारशक्ती वाढते. रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी इतरही अनेक द्रव्ये उपयोगी पडतात. जिरा पाणी प्यायल्याने अशक्तपणा कमी होतो. कारण जिऱ्यातील आयर्न म्हणजेच लोह त्यादृष्टीने उपयोगी पडत असते. त्याच्यामुळे रक्तप्रवाह सुरळीत होतो. जिरा पाण्याने रक्तदाब आटोक्यात राहतो आणि वजन घटण्यास मदत होते. शरीरातील चयापचय क्रिया वेगवान करण्याची ताकद जिरा पाण्यात असते. त्याशिवाय जिरा पाणी त्वचेलाही उत्तम असते. त्वचेचे अनेक विकार जिरा पाण्यामुळे दुरुस्त होतात. जिरा पाणी तयार करण्यासाठी एक लिटर पाणी घ्या आणि त्यात २ चमचे जिरे टाकून चार ते पाच मिनिटे उकळवा. उकळल्याने पाण्याचा रंग बदलतो. हे पाणी काही वेळ थंड होऊ द्या. ते एका बाटलीत साठवून ठेवा आणि दिवसभरात जमेल तसे प्या. जिरा पाणी फार थंड करू नये. हे जिरा पाणी तयार करण्यासाठी कच्चे जिरे वापरावे. भाजलेले जिरे वापरू नये. त्यातल्या त्यात पूर्ण जिरे वापरावे. जिरा पावडर वापरू नये. दररोज स्वतंत्र जिरा पाणी तयार करावे. एक दिवस तयार केलेले जिरा पाणी दुसऱ्या दिवशी वापरू नये.

**घरात खूप वांगी असतील, भरली किंवा मसाल्याची भाजी करण्यास वेळ नसेल, तर एक झटपट भाजी म्हणून हा प्रकार करावा. सोपी कृती आहे, कष्ट फारसे नाहीत. एका बाजूला पोळ्या करताना सहज होऊन जाते.**

# वांग्याची झटपट सुकी भाजी



**साहित्य :** ताजी वांगी पाव किलो /८-९ (मोठ्या आकाराची असतील तर उत्तम), कोथिंबीर बारीक चिरून, लाल तिखट चवीनुसार, मीठ चवीनुसार, धण्याची पूड चिमूटभर, हळद चिमूटभर, दाण्याचे कूट /तिळाचे कूट, तेल थोडेसे-फोडणीसाठी, हिंग, कुठला तुमचा खास गरम /काळा /घरगुती मसाला असेल तर तोही घ्या चिमूटभर, नाहीतर फार विचार न करता चिमूटभर गरम मसाला द्या ढकलून, चार दाणे साखर.

**पाककृती :** जाड बुडाच्या कढईत तेल तापत ठेवावे. नेहमीच्या फोडणीला घेतो त्यापेक्षा जास्तच तेल घ्यावे. अंदाजे छोटी अर्धी वाटी वगैरे. ताजी रसरशीत वांगी घ्यावीत. काटे काढून टाकावेत. वांग्याच्या उभ्या फोडी चिरून घ्याव्यात. पाण्यात भिजवू नये. सगळी तयारी करून शेवटी वांगी चिरून थेट फोडणीत घालता येतील असे पाहावे. तेल तापले की त्यात मोहरी/जिरे तडतडवून आणि हिंग घालून फोडणी करावी, चिरलेली वांगी फोडणीत घालून नीट मिसळून घ्यावे. आता कढईवर झाकण ठेवून अत्यंत मंद आचेवर वांगी स्वतःच्या रसात वाफेवर शिजतील या आशेवर पोळ्या किंवा इतर वेळखाऊ काम करावे. १५-२० मिनिटात वांगी चांगली परतल्या जातात आणि त्यांच्या आकार बदलतो. भाजीच्या फोडी परतून झाल्यानंतर त्यात लाल तिखटाची पूड, मीठ, हळद, मसाला, दाण्याचे कूट, साखरेचे फक्त ४ दाणे घालून मिसळून घ्यावे/ पुन्हा एकदा कढईवर झाकण ठेवून अत्यंत मंद आचेवर ५ मिनिटे ठेवावे. शेवटी सजावटीसाठी कोथिंबीर आहेच! अशाच प्रकारे गवारीच्या शेंगेचे दोन भाग तोडून तिचीही सुकी भाजी करता येते.

**अधिक टिप्स : ■ फार मसाले वगैरे लागत नाहीत. तेल जास्त लागते मात्र! ■ ही भाजी शक्य तितक्या मंद आचेवर होऊ द्यावी ■ यात कांदा,लसूण, आलं वगैरेची गरज नाही, पण आवडत असेल तर फोडणीत बारीक ठेचून घालू शकता.**

# चाळिशीतल्या चालीवरून तुमचं म्हातारपण कसं असेल हे कळणार?

**वयाच्या चाळिशीत असताना लोक कसे चालतात त्यावरून त्यांचा मेंदू आणि शरीर किती म्हातारं झालं आहे, हे कळू शकतं. शास्त्रज्ञ यासंबंधी संशोधन करत आहेत. चालण्याच्या गतीची एक साधी चाचणी घेऊन शास्त्रज्ञ म्हातारे होत जाण्याची प्रक्रिया जाणून घेऊ शकतात. संथपणे चालणाऱ्या लोकांचं शरीर लवकर म्हातारं होतंच, त्यासोबत त्यांचा चेहरा वयस्कर दिसू लागतो आणि त्यांच्या मेंदूचा आकारही लहान असल्याचं संशोधनातून निष्पन्न झालं आहे. हे एक आश्चर्यकारक संशोधन असल्याचं शास्त्रज्ञांनी म्हटलं आहे.**



**साधारणपणे** वयाच्या पासष्टीनंतर सर्वांगीण आरोग्य तपासण्यासाठी डॉक्टर चालण्याची गती तपासत असतात. कारण चालण्यातून स्नायूंची बळकटी, फुफ्फुसाची कार्यक्षमता, संतुलन, मणक्याची मजबुती तसंच दृष्टी या सर्वांबद्दलच योग्य अंदाज येतो. वृद्धत्वाकडे झुकलेले असताना संथपणे चालणाऱ्या व्यक्तींना स्मृतिभ्रंश होण्याची शक्यताही जास्त असते.

**समस्येचे संकेतदर्शक**

न्यूझीलंडमध्ये याबाबत एक अभ्यास करण्यात आला. यामध्ये ७० च्या दशकात जन्मलेल्या म्हणजेच आता साधारणपणे ४५ वर्षे वय असलेल्या व्यक्तींच्या चालण्याची तपासणी करण्यात आली. अभ्यासात सहभागी झालेल्या व्यक्तींची शारीरिक क्षमता तसंच मेंदूची कार्यक्षमताही बारकाईने तपासण्यात आली होती. लहानपणापासून या व्यक्तींची दोन वर्षांतून एकदा आकलन आणि बुद्ध्यांक चाचणीही करण्यात आली होती. संथ चाल हे म्हातारपणी येऊ शकणाऱ्या समस्यांचे संकेत जवळपास दहा वर्षे आधीच देत असल्याचं अभ्यासातून दिसून आलं, अशी माहिती प्रा. टेरी ई. मॉफिट यांनी दिली. मॉफिट हे लंडनच्या किंग्ज कॉलेज ऑफ लंडन तसंच अमेरिकेतल्या ड्यूक युनिव्हर्सिटीतील प्रमुख लेखक आहेत. ४५ वर्षे वयात चालण्याच्या वेगात बराच फरक पाहायला मिळतो. न धावता जास्तीत जास्त ४ मीटर/सेकंद इतक्या वेगाने चालता येऊ शकतं. संथपणे चालणाऱ्या व्यक्तींमध्ये वय वेगानं वाढण्यासोबतच फुफ्फुस, दातांच्या समस्या आणि क्षीण रोगप्रतिकारकशक्ती ही लक्षणं वेगानं चालणाऱ्या व्यक्तींच्या तुलनेत अधिक दिसून आली. सर्वात अनपेक्षित गोष्ट म्हणजे, मेंदूचं बारकाईने निरीक्षण केलं असता संथ चाल असलेल्या व्यक्तींचा मेंदू जास्त वयाचा दिसत असल्याचं संशोधनात आढळलं. मुलं तीन वर्षांची असल्यापासूनच बुद्धिमत्ता, भाषा आणि मुलांच्या हालचाली तसंच वाढीची क्षमता यांची चाचणी घेतल्यास वयाच्या ४५ व्या वर्षी त्याची चाल कशी असेल याचा अंदाज लावता येऊ शकतो, असं संशोधनात सिद्ध झालं आहे. संथ चालीसह मोठे होणाऱ्या मुलांचा (१.२ मीटर/सेकंद) बुद्ध्यांक वेगवान चाल असणाऱ्या मुलांच्या (१.७ मीटर/सेकंद) बुद्ध्यांकापेक्षा १२ गुणांनी कमी असल्याचं ४० वर्षांनंतर आढळून येतं.

**जीवनशैलीशी संबंध**


■ संशोधकांच्या आंतरराष्ट्रीय समूहाने जामा नेटवर्क ओपनमध्ये याविषयी लिहिलं आहे. आरोग्य आणि बुद्ध्यांक यामधला फरक आपल्या जीवनशैलीशी संबंधित असू शकतो किंवा अगदी सुरुवातीला असलेलं उत्तम आरोग्य या बाबींशी संबंधित असू शकतं, असा यामध्ये उल्लेख आहे. ■ आपल्याला उत्तम आरोग्य लाभणार की नाही याचे संकेत हे खूप आधीपासूनच मिळत असल्याचं संशोधक स्पष्ट करतात. ■ तरुण वयातील चालण्याचा वेग मोजणं हा आपलं म्हातारपण तपासण्यासाठीचा एक मार्ग असू शकतो, असं संशोधकांनी सांगितलं आहे. ■ हलकं जेवण घेण्यापासून ते मेटमॉर्फिन औषधापर्यंत विविध उपचारांचा शोध सध्या घेतला जात आहे. ■ आपल्या आरोग्याबाबत मेंदू आणि शरीराचे काही संकेत असतात. तरुण आणि निरोगी राहण्यासाठी आपल्या जीवनशैलीत बदल केल्यास उत्तम आयुष्य जगता येऊ शकतं, असं शास्त्रज्ञांनी स्पष्ट केलं आहे.

# महत्त्वाचा कानमंत्र



- बोरे, अंजीर, पेरू यामध्ये अळ्या असण्याची शक्यता असते. म्हणूनच ही फळे धुवून, कापून खावीत.
- तेलकट कपडे धुताना पाण्यात साबणाबरोबर २-४ चमचे साखर टाकावी आणि त्यात कपडे भिजवावेत. यामुळे तेलकटपणा लगेचच जातो.
- फ्रीज साफ करताना कोमट पाण्यात थोडा सोडा घालून मऊसर कपड्याने पुसून घ्यावा. यामुळे फ्रीज स्वच्छ होतो.
- सिल्कचे ब्लाऊज सौम्य शाम्पूने धुवावे. म्हणजे रंग जात नाही आणि खराबही होत नाही.
- केराच्या बादलीत थोडेसे फिनेल शिंपडून ठेवल्यास घाण वास येत नाही आणि त्याभोवती चिलटे घोंगावत नाहीत.
- केसांवर अथवा कपड्यांवर च्युइंगम चिकटले असल्यास त्यावर बर्फाचा खडा फिरवावा. यामुळे चिकटलेले च्युइंगम लगेचच निघते.

# रंगाला अनुसरून करा मेकअप



**गोऱ्या रंगासाठी :**

आपला रंग गोरा असेल तर ती निसर्गाकडून मिळालेली उत्तम देणगी आहे. पण जर गोरा असूनही आपला रंग काहीसा दबल्यासारखा वाटत असेल तर त्यावरही उपाय आहे. त्यात चमक आणण्यासाठी पीच वा शियर ब्रांझ ब्लशर लावायला हवा. तो नैसर्गिक रंगात राखू इच्छित असाल तर पेल पिंक रंगाची शेडही सोबत लावा. डोळ्यांना नेव्ही ब्ल्यू, सिल्व्हर ग्रे, सॉफ्ट पेस्टल, लायलॅक, स्काय ब्ल्यू, वा टेराकोटा रंग खूप शोभेल. तसेच न्यूड, बेबी पिंक, रोझी ब्राऊन व शिअर रोड लिपस्टिक वापरायला हवी.



**गडद रंगाच्या त्वचेसाठी :**

ब्लशरमध्ये डीफ प्लम, डार्क रोझ वा करेंट लावावे. डोळ्यांच्या सौंदर्यासाठी ब्राऊन मॅट, गोल्ड ब्रांझ वा सिल्व्हरची शिमरी शेड लावावी. लिपस्टिकसाठी ब्लॅक बेरी, पिच, डीफ रेड, पर्पल, कॅरेमल यापैकी कोणताही रंग निवडू शकता.



**पिवळ्या रंगाची त्वचा :**

या त्वचेवर लाल वा नारंगी रंगाचा वापर करू नये. ब्राऊनिश रोझ वा कोको ब्राऊन, डीफ पर्पल वा मिडलाईट ब्ल्यऊआयशॅडो वापरावा. ओठ सुंदर दिसण्यासाठी रोझी बेझ, डीफ रेड वा शियर ब्राऊन यापैकी काहीही लावू शकतात.

**गव्हाळ त्वचेसाठी :**

या रंगाची रंगत वाढवण्यासाठी रोझ शेड वा म्युटेड टाऊनी ब्लशर वापरावा. ऑरेंज बेस कधीही लावू नये. डोळ्यांसाठी अर्थ टेन शेड म्हणजेच डार्क ग्रे, बेझ, मशरुम शेड वापरू शकता. ओठ नॅचरल दिसण्यासाठी शियर वा बेरी टिंटेड ग्लास लावावेत.

# डेंग्यूचा ताप या समस्या निर्माण करतो

**डेंग्यूचा ताप हा एक व्हायरल एडीस इजिप्ती डासांनी पसरणारे संक्रमण आहे. असा ताप आला असता लगेच उपचार न केल्याने रुग्णाची परिस्थिती गंभीर होऊ शकते. यासाठी डेंग्यूचा उपचार वेळेवर करणे गरजेचे आहे. डेंग्यूच्या तापाने शरीरावर रक्ताचे डाग आणि डेंग्यू आघात सिंड्रोम सारखी लक्षणे निर्माण होऊ शकतात. यामुळे फुफ्फुस, यकृत आणि हृदयाला धोका निर्माण होतो.**

**काय आहेत डेंग्यूच्या तापाची लक्षणे –**

- पोटात दुखणे
- नाक, तोंड आणि हिरड्यातून रक्तस्राव होणे
- रक्ताची किंवा सुकी उलटी होणे
- भूक कमी होणे
- थकवा येणे
- सांधे किंवा मांसपेशी दुखणे

**डेंग्यू आघाताचे सिंड्रोम–**

डेंग्यू आघात सिंड्रोममुळे त्वचेवर रक्ताचे छोटे डाग दिसतात आणि त्वचेच्या खाली रक्ताचे मोठे डाग दिसू शकतात.

- ब्लड प्रेशर कमी होते
- श्वास घेताना त्रास होतो
- थंड आणि चिकट त्वचा
- तोंड कोरडे पडते
- अस्वस्थता जाणवते



# खाल्ल्या मिठाचे परिणाम

**खाल्ल्या** मिठाला जागावे असे आपले नीतीशास्त्र सांगते. सगळेच लोक खाल्ल्या मिठाला जागत नाहीत. पण मीठ मात्र याबाबतीत पक्के कृतज्ञ असते. जो जास्त मीठ खाईल त्याच्या शरीरात मीठ अगदी इमानदारीने आपले परिणाम दाखवतेच. एखादा पदार्थ थोडेसे जादा मीठ घालून खाल्ला तर बरा लागतो, परंतु हेच मीठ आपल्या शरीराचा शत्रू बनत असते. आपण कितीही दुर्लक्ष केले तरी मीठ आपला प्रताप दाखवतेच. अधिक मीठ खाल्ल्यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास होतो हे तर सर्वांना माहीतच झालेले आहे. म्हणून रक्तदाबाची तक्रार घेऊन एखादा पेशंट डॉक्टरकडे जातो तेव्हा डॉक्टर रक्तदाबाची गोळी तर देतातच पण मीठ कमी खाण्याचा सल्ला देतात.

ज्यादा मीठ खाल्ल्याने हृदयविकाराची शक्यता वाढते. त्याचबरोबर रक्तदाब वाढल्यामुळे आणि शरीराच्या हालचाली कमी झाल्यामुळे रोगप्रतिकारकशक्ती कमी होते. मिठातील सोडियममुळे मूत्रपिंडाच्या कार्यावरही परिणाम होतो. मूत्रपिंड हे शरीराच्या रक्तातील अशुद्ध घटक गाळून रक्ताला शुद्ध घटक मिळवून देणारा अवयव असतो. ते एक प्रकारचे फिल्टर असते. मात्र हे फिल्टर मिठामुळे बाधित होते आणि फिल्टरचे काम म्हणावे तसे होत नाही. रक्तात अशुद्ध घटक मिसळले जातात आणि त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. ज्यादा मीठ खाण्याने त्वचेवरही परिणाम होतात. त्वचा फुगायला लागते. म्हणजे चेहरा, हात, पाय, विशेषतः मनगट सुजल्यासारखे होते.



# व्यायामाचेही व्यसन नको

**शरीर** तंदुरुस्त राहण्यासाठी आणि मन मजबूत राहण्यासाठी व्यायाम करणे आवश्यकच आहे. व्यायामाच्या गरजेबाबत कोणाचेच दुमत होणार नाही. परंतु काही मानसशास्त्रज्ञ व्यायामाच्या बाबतीत एक इशारा देत आहेत की व्यायाम करा पण व्यायामाचे व्यसन लावून घेऊ नका. व्यायामाच्या अनावश्यक आहारी जाऊ नका.

दारू पिणारा माणूस जसा एडिक्ट होण्याची शक्यता असते तसेच व्यायाम करणाराही व्यायामाच्या बाबतीत एडिक्ट होण्याची भीती असते आणि म्हणून आपण व्यायाम करत आहोत की नाही हे तर पहाच पण आपण व्यायामाच्या बाबतीत व्यसन लावून घेत आहोत की काय यावरही लक्ष ठेवा, असे मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

शरीर तंदुरुस्त असले पाहिजेच, परंतु आपल्या दिवसातले सारे रुटीन केवळ त्यासाठीच्या व्यायामाच्या भोवती गुंफले जात असेल तर हा धोका संभवतो. जेव्हा आपण व्यायाम करतो तेव्हा शरीरातून एण्डॉर्फिन आणि सेरेटोनिन ही दोन द्रव्ये पाझरत असतात. त्यांचा उपयोग आपल्याला होत असतो. एण्डॉर्फिनमुळे मानसिक डिप्रेशन कमी होते तर सेरेटोनिनमुळे मनावरचा ताण कमी होतो. मात्र आपण या स्थितीच्या आहारी गेलो तर आपल्या स्नायूंमध्ये काही दोष निर्माण होण्याची शक्यता असते.



एवढेच नव्हे तर व्यायाम केल्याशिवाय पर्यायच नाही अशी स्थिती निर्माण होऊन एखादा दिवस व्यायाम बुडत असेल तर त्या दिवशीच्या त्या भावनेपोटी काही शारीरिक कटकटीही निर्माण होत असतात. तेव्हा एखादा दिवस व्यायाम केला नाही तर फार मोठे नुकसान होईल ही भावना मनातून काढली पाहिजे. व्यायामातून निर्माण होणारी शरीराची तंदुरुस्ती ही स्वागतार्हच असते. परंतु आपल्या आयुष्याला परिपूर्णता येण्यासाठी एवढी एकच गोष्ट आवश्यक नाही.

व्यायामसुद्धा मोजकाच आणि नेमकाच करावा. परंतु काही लोकांच्या मनामध्ये असा गैरसमज असतो की जितका जास्त वेळ व्यायाम तेवढे आरोग्य उत्तम. वास्तविक हा गैरसमज आहे. शरीरसुद्धा एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच तंदुरुस्त होत असते. त्या मर्यादेपर्यंत शरीर मजबूत होण्यासाठी जेवढा व्यायाम आवश्यक आहे तेवढाच व्यायाम केला पाहिजे. उगाच फार मोठी बॉडीबिल्डिंग होईल म्हणून अधिकाधिक वेळ जीममध्ये काढायला लागलो तर त्याचा फायदा तर होत नाहीच पण जीममधला तो अनावश्यक वेळ वाया जातो. ज्याचा इतर कामांवर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते.

# उभे राहून पाणी प्यायल्याने होऊ शकतात 'हे' त्रास

**आपण** अनेकदा बाहेरून घरी आल्यानंतर किंवा खेळून आल्यानंतर उभे राहून घटाघटा पाणी पितो. ही सवय आपल्या आरोग्याला अपायकारक ठरू शकते. उभे राहून पाणी प्यायल्याने गॅसेसचा किंवा किडनीसंबंधी समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे पाणी बसून प्यायलेले केव्हाही चांगले. बाहेरून दमून किंवा उन्हातून आल्यावर आपण घटाघटा पाणी पितो तेव्हा घरातील मोठ्यांकडून आपण ओरडा खातो. आता असे उभे राहून पाणी पिण्याचे कोणते त्रास होतात पाहूया...



**पचनाचे विकार –**

उभे राहून पाणी प्यायल्यास ते शरीरात अतिशय वेगाने खाली जाते. अशामुळे अन्ननलिकेवर ताण येतो आणि असे वारंवार झाल्यास पचन प्रक्रियेत समस्या निर्माण होण्याची शक्यता असते.

**किडनीचे विकार –**

उभे राहून पाणी प्यायल्यास ते शरीरातून वेगाने वाहून जाते. शरीरातील अनावश्यक घटक वाहून नेण्याचे काम पाण्याद्वारे केले जाते. मात्र, उभे राहून पाणी प्यायल्याने ही प्रक्रिया योग्य पद्धतीने होत नाही. यामध्ये किडनी आणि मूत्राशयातील अनावश्यक घटक तसेच राहतात. त्यामुळे मूत्रमार्ग किंवा किडनीत संसर्ग होण्याची शक्यता वाढते आणि किडनीचे विकार होण्याची शक्यता जास्त असते.

**सांधेदुखी –**

उभ्याने आणि घाईघाईने पाणी पिण्याची सवय आरोग्यासाठी धोकादायक आहे. अशाप्रकारे पाणी प्यायल्याने शरीराच्या सांध्यांतील द्रव पदार्थांचे संतुलन बिघडते त्यामुळे सांधेदुखीचा त्रास होण्याची शक्यता असते.

# महाराष्ट्रात कायद्याचीच भाषा!

## लव्ह जिहाद कायद्याचा पहिला ड्राफ्ट... सरकारची सावध पावलं

राज्यातील न्यायव्यवस्थेमध्ये येत्या काळात एक नवा आणि तितकाच महत्त्वाचा कायदा जोडला जाणार असल्याची माहिती असून, हा कायदा अंमलात आणण्यासाठी राज्य सरकार स्तरावरही हालचाली सुरू असल्याचं म्हटलं जात आहे.



**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

महाराष्ट्र राज्य शासनाकडून सध्या लव्ह जिहाद कायदा अंमलात आणण्यासाठी सरकार स्तरावर हालचाली सुरू असल्याची अतीव महत्त्वाची माहिती नुकतीच समोर आली आहे. राज्याच्या पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या २ ते ३ बैठका संपन्न झाल्या असून, लव्ह जिहाद कायद्याचा पहिला ड्राफ्ट विधी व न्याय विभागाकडे तयार असल्याची प्राथमिक माहिती सूत्रांनी दिली आहे.

लव्ह जिहाद कायदा संवेदनशील असल्याने राज्य सरकारकडून बारीक निरीक्षणं लक्षात घेत सावध पावलं उचलणं महत्त्वाचं ठरणार आहे. परिणामी देशातील इतर राज्यांमध्ये तयार झालेल्या धर्मांतर विरोधी कायद्याचा देखील विशेष समितीकडून अभ्यास केला जात असल्याची माहिती सुत्रांमार्फत मिळाली.

२०२५ मधील फेब्रुवारी महिन्यात राज्य सरकारकडून पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समितीची स्थापना करण्यात आली. या समितीत महिला व बालविकास, अल्पसंख्याक विकास, विधी व न्याय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य तसंच गृह विभागाचे सचिव यांचा समावेश होता.

### भाजप आमदारांकडून महाराष्ट्रात या कायद्याची मागणी

महाराष्ट्रातील विद्यमान परिस्थितीचा अभ्यास करुन लव्ह जिहाद, बलपूर्वक किंवा फसवणुकीने धर्मांतराच्या प्रकरणांचा अभ्यास, इतर राज्यातील कायद्यांचा अभ्यास, आणि त्यानुसार समितीकडून कायदा सुचवण्याची शिफारस करण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तराखंड, गुजरात, हिमाचल प्रदेश आणि राजस्थानमध्ये लव्ह जिहाद आणि धर्मांतर विरोधी कायदा लागू असून, भाजप आमदारांकडून महाराष्ट्रात अशा प्रकारचा कायदा असावा अशी मागणी सातत्यानं करण्यात आली होती. त्यानंतर विशेष समितीची स्थापना करत कायदा तयार करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आल्याचं म्हटलं गेलं. मागील काही वर्षांपासून महाराष्ट्रात सातत्यानं लव्ह जिहाद आणि अवैधरित्या, बळजबरीनं केल्या जाणाऱ्या धर्मांतराच्या विरोधात कायदा करण्यासाठी जनआक्रोश मोर्चेसुद्धा काढण्यात आले होते. ज्यावर कायदा काढणार असल्याची आश्वासक भूमिका सरकारनं मांडली. मात्र राज्यात लव्ह जिहाद आणि तत्सम भूमिका काही केल्या थांबण्याचं नाव घेत नसून त्या आणखी क्रूर होत चालल्या असल्यानं त्याविरोधातील कठोर कायद्याची मागणी हिंदु जनजागृती समितीनेही राज्यशासनाकडे केली होती. ज्यावर आता वेगानं पावलं उचलली जात असल्याचं स्पष्ट होत आहे.

# २ वर्ष लाईट नाहीत, खाण्या पिण्याचे वांदे, उपासमारीची वेळ!

## आंतरजातीय विवाहामुळे सामाजिक बहिष्कार, दांपत्याची व्यथा ऐकून डोळ्यांत येईल पाणी

**■चंद्रपूर। प्रतिनिधी,**

लग्न... दोन जीवाचं लग्न होत असलं तरी ते दोन कुटुंबानांही एकत्र आणतं. आपल्याकडे लग्न म्हणजे ७ जन्मांचं बंधन मानलं जातं. पण हेच लग्न एखाद्याच्या मुळावर उठत असेल तर? लग्न केलं म्हणून जर एखाद्याला वाळीत टाकून, त्यांच्यावर बहिष्कार टाकून, जगणं नकोसं करत असतील तर? लव्ह मॅरेज केलं, आंतरजातीय विवाह केला म्हणऊन एखाद्या कुटुंबावर पूर्णपणे बहिष्कार टाकून, त्यांना त्रास दिल्याची घटना, आज या २१ व्या शतकाहीतही घडली आहे. पुरोगामी राज्य म्हणवल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात, हा प्रकार घडलाय.

चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यात असलेल्या सरडपार गावात ही धक्कादायक घटना घडली आहे. तिथे राहणाऱ्या सचिन आणि सुजाता यांना लग्नाची मोठी किंमत



चुकवावी लागली आहे. आम्ही आंतरजातीय विवाह केला त्यामुळे आमच्या कुटुंबियांसह संपूर्ण गावाने आमच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला असा आरोप सचिन व सुजाता यांनी केला आहे. गेल्या २ वर्षांपासून ही परिस्थिती असून त्यामुळे कोणी बोलत नाही, कुठेही कार्यक्रमात आम्हाला बोलावत नाहीत, एवढंच काय गेल्या २ वर्षांपासून आम्चाया घरात साधे लाईटही नाही अशा शब्दांत या जोडप्याने आपली आपबिती सांगितली. गावच्या या बहिष्कारामुळे त्यांना दोन वेळच्या जेवणाचीदेखील भ्रांत सतावते.

### काय आहे प्रकरण?

चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यात असलेल्या सरडपार गावात राहणारे सचिन आणि सुजाता यांचंलग्न झालं. सचिन हे अनुसूचित जातीतले आहेत तर सुजाता या अनुसूचित जमातीतील आहे, अशी माहिती समोर आली आहे. तीनेक वर्षांपूर्वी म्हणजेच मे २०२३ मध्ये त्या दोघांनी एकमेकांशी लग्न केलं. त्यांचा आंतरजातीय विवाह होता. मात्र त्यांच्या घरच्यांना हे पसंत नव्हतं. त्यावरून कुटुंबियांमध्ये वाद सुरू झाले. सचिन यांची आई व भाऊ यांना हे लग्न मान्य नव्हतं, वाढत्या वादानंतर सचिनची आई व भावाने त्यांचं गावातलं घर सोडलं. नंतर त्यांनी सिंदेवाही येथे आपला मुक्काम हलवला. पण आपल्या कुटुंबियांनी गावातल्या सर्व लोकांना आपल्या वरोधात भडकावलं. त्यामुळे संपूर्ण गावाने आपल्यावर बहिष्कार टाकला असा आरोप सचिन व सुजाता यांनी केला. सगळ्या गावाने आणि विशेषतः आमच्या जातीतील लोकांनी आमच्यावर सामाजिक आणि आर्थिक बहिष्कार टाकलाय. गेल्या दोन वर्षांपासून घरात वीज नाही, आमच्याशी कोणी बोलत नाही, कोणत्याही कार्यक्रमात आम्हाला निमंत्रण दिलं जात नाही. खाण्या-पिण्याचे हाल होता, परिस्थिती खूपच हलाखीची आहे, असं या दांपत्याने सांगितलं. एवढंच नव्हे तर या दांपत्यच्या १ वर्षाच्या मुलालाही या बहिष्काराची झळ पोहोचली आहे. त्या निरागस बाळाला आशा वर्करकडून कोणत्याही प्रकारची लस किंवा इतर गोळ्या दिल्या गेल्या नाही असा आरोप सचिन व सुजाताने केलाय. याप्रकरणी पलिसांकडे दाद मागितली, तरीही काही फायदा झाला नाही. आम्ही पोलिसांत अनेक वेळा तक्रार दिली, पण अद्याप यावर कुठलीही कारवाई झालेली नाही असंही त्यांनी सांगितलं. मात्र दुसरीकडे गावातील लोकांनी या दाम्पत्यावर कुठल्याही प्रकारचा सामाजिक आणि आर्थिक बहिष्कार टाकण्यात आल्याच्या बाबीचा स्पष्टपणे इन्कार केला आहे. यामुळे एकच खळबळ माजली आहे.

# ५ मार्चपासून मुंबईत खाजगी बस सेवा बंद... बस मालकांचा 'ऑफ-रोड' आंदोलनाचा इशारा

### असोसिएशनचं शाळा आणि संस्थांना आवाहन

बस मालकांचा आरोप आहे की, वारंवार तक्रारी आणि चर्चा करूनही, संबंधित राज्य सरकारी अधिकाऱ्यांनी ठोस उपाय करण्यात अपयशी ठरलं आहे. सध्याच्या कारवाईमुळे वाहतूक व्यवसायावर आर्थिक दबाव वाढत आहे आणि कामकाजात अनिश्चितता निर्माण होत आहे. असोसिएशनने कंपन्या आणि संस्थांना ५ मार्चपासून कर्मचाऱ्यांसाठी पर्यायी प्रवास व्यवस्था करण्याचं आवाहन केलं आहे. शाळा प्रशासन आणि पालकांनाही विद्यार्थ्यांच्या देखभालीवर आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आलं आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

ई-चलान प्रणालीच्या कथित चुकीच्या आणि अस्पष्ट वापराच्या निषेधार्थ मुंबई बस मालक संघटनेने ५ मार्चपासून अनिश्चित काळासाठी 'ऑफ-रोड' आंदोलन सुरू करण्याचा इशारा दिली आहे. जर सरकारने त्यांच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर खाजगी बस सेवा बंद केल्या जाऊ शकतात, ज्यामुळे मुंबईतील मोठ्या संख्येने प्रवाशांची गैरसोय होऊ शकते, असं त्यांचं म्हणणं आहे.



केंद्रीय सचिव के. व्ही. शेट्टी यांनी दिली माहिती

केंद्रीय सचिव के. व्ही. शेट्टी यांनी याबाबत माहिती देताना सांगितलं की, महाराष्ट्र राज्य ट्रक, टेम्पो, बस (शाळा, कर्मचारी आणि प्रवासी) ट्रेलर फेडरेशन, मुंबई बस मालक संघटना आणि इतर संघटनांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स कृती समितीमार्फत हे आंदोलन केलं जाईल. मुंबई महानगर प्रदेशात जवळपास २५,००० ते ३०,००० खाजगी बसेस (शाळा, कॉर्पोरेट आणि प्रवासी सेवा) चालतात. जर हे आंदोलन यशस्वी झालं तर त्याचा शालेय विद्यार्थी, कार्यालयीन कर्मचारी आणि सामान्य प्रवाशांवर मोठा परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत, बेस्ट बसेस हा एकमेव उपाय असू शकतो.

के. व्ही. शेट्टी यांनी असं स्पष्ट केलं की, "ई-चलान प्रणाली चुकीच्या पद्धतीने आणि स्पष्ट नियमांशिवाय वापरली जात आहे. शिवाय, अंमलबजावणीमध्ये पारदर्शकतेचा अभाव आहे आणि सुरक्षिततेच्या नावाखाली रेट्रोफिटिंग नियम जबरदस्तीने लागू केले जात आहेत. या मुद्द्यांचाच निषेध करण्यासाठी हे आंदोलन केलं जाईल."

# भिगवण अपहरण प्रकरणात वेगळीच कलाटणी! मुलीने कोर्टात निर्णय पलटला

खरं तर, लग्नासाठी अवघे काहीच दिवस शिल्लक असताना भिगवण येथे एका तरुणीचं अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. मात्र या प्रकरणाला नंतर मोठा ट्विस्ट मिळाला. संबंधित तरुणीचा एक व्हिडिओ समोर आला आणि त्यात तिने अपहरण झाल्याचा आरोप फेटाळून लावत संबंधित तरुणासोबत आपल्या मर्जीनं गेल्याचं सांगितलं. आता, या प्रकरणाचा वेगळीच कलाटणी मिळाली असून संबंधित तरुणीने आपल्या आईकडे जाण्याची इच्छा व्यक्त केल्याचं वृत्त समोर आलं आहे.

**■पुणे। प्रतिनिधी,**

भिगवण येथील तरुणीचं अपहरण करण्यात आल्याच्या प्रकरणात आता नवा ट्विस्ट आला आहे. आज इंदापूर कोर्टात भिगवण अपहरण घटनेच्या संदभार्तील तारखेत महत्त्वाचा आणि कलाटणी देणारा निर्णय झाला असून कोटार्ने मुलीच्या इच्छेनुसार मुलीला आईकडे सुपूर्त करण्याचे आदेश दिल्याचं वृत्त समोर आलं आहे. या प्रकरणातील मुलीने आता आई आणि मामाकडे जाण्याची इच्छा व्यक्त केली असल्याचं सांगण्यात येत आहे.

कोर्टात नेमकं काय घडलं?



कोर्टाच्या सुनावणीनंतर मुलीच्या आईच्या बाजूने कोर्टात युक्तीवाद करणाऱ्या वकिलांनी याबाबत प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, "भिगवण येथील मुलीचं अपहरण करण्यात आल्याच्या प्रकरणी मुलीच्या आईच्या मार्फत वकीलपत्र दाखल करुन आम्ही तिथे हजर झालो. त्यावेळेस संबंधित मुलीला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे कोर्टात हजर करण्यात आलं. कोटार्ने तिला तिची संमती विचारली असता, तिने आई आणि तिच्या मामासोबत जाण्याची इच्छा व्यक्त केली. त्या अनुषंगाने कोर्टात मुलीचा ताबा तिच्या आई आणि मामाकडे देण्याचा आदेश पारित केला आहे."

पुढे ते म्हणाले की, "आई आणि मामा वेगवेगळ्या ठिकाणी राहतात. पण सध्या मुलगी सुधारगृहात असून पुढील आदेश आल्यानंतर तिला तिच्या आई आणि मामाच्या ताब्यात देण्यात येईल."

# "आई-बाबा त्रास करून घेऊ नका..." बारावीच्या परीक्षेच्या भितीने संपवलं आयुष्य!

**■कल्याण। प्रतिनिधी,**

कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी परिसरात बारावीची विद्यार्थीनी असलेल्या एका १७ वर्षीय अल्पवयीन तरुणीने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. अक्षरा नितीन रेणुसे अशी मृत तरुणीची ओळख असून बुधवारी (२५ फेब्रुवारी) सकाळच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. परीक्षेच्या भितीमुळे आणि अपयशाच्या मानसिक दडपणामुळे तरुणीने हे टोकाचं पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित अक्षरा शहरातील एका नामांकित महाविद्यालयात १२ वी कॉमर्स शाखेत शिक्षण घेत होती. सध्या सुरू असलेल्या बारावीच्या परीक्षांमध्ये आपण उत्तीर्ण होणार नाही, आपल्याला अपयश येईल, अशी




भिती तिच्या मनात निर्माण झाली होती. याच मानसिक तणावातून अक्षराने तिच्या घरातील पोटमाळ्यावर गळफास घेऊन आत्महत्या केली. हा भयानक प्रकार कुटुंबियांच्या निदर्शनास आल्यानंतर तिला तातडीने खाली उतरवण्यात आलं, मात्र त्यावेळी तिचा मृत्यू झाल्याचं स्पष्ट झालं.

**सुसाईड नोटमध्ये काय लिहिलं?**

आत्महत्या करण्यापूर्वी अक्षराने एक चिट्ठी (सुसाईड नोट) लिहून ठेवली होती. त्या चिट्ठीत तिने आपल्या पालकांविषयी भावना व्यक्त करत "आई-बाबा, यापुढे मी तुम्हाला त्रास देणार नाही, मी गेल्यावर आई-बाबा त्रास करून घेऊ नका..." असा मजकूर लिहिला होता. कोळसेवाडी पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, ही घटना केवळ परीक्षेच्या भीतीमुळे घडली की यामागे इतर काही वैयक्तिक कारणे आहेत, याचा तपास पोलीस करत आहेत.

**१२ वी परीक्षेच्या भितीमुळे आत्महत्या**

तरुणीने १२ वी परीक्षेच्या भितीमुळे आत्महत्या केल्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान काही दिवसांपूर्वीच, एका तरुणाने रेबीज होण्याच्या भीतीने आत्महत्या केल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता परीक्षेच्या भीतीतून विद्यार्थिनीने उचललेल्या या पावलामुळे तरुण वगार्तील वाढत्या मानसिक तणावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# भाजप आमदाराच्या गाडीवर जीवघेणा हल्ला... कट रचल्याचा आरोप, तीन पोलीस निलंबित

**■नागपूर। प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील धनौरा मतदारसंघाचे भाजप आमदार राजीव तरारा यांच्या गाडीवर २२ फेब्रुवारी २०२६ रोजी संध्याकाळी जीवघेणा हल्ला करण्यात आलाय. या भीषण घटनेमुळे राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. आमदार तरारा हे धनौरा येथून अमरोहाच्या दिशेने जात असताना, वाटेत एका रेल्वे फाटकापाशी त्यांची गाडी थांबलेली होती. याच संधीचा फायदा घेत दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांनी त्यांच्या गाडीवर अचानक दगडफेक सुरू केली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोरांनी केवळ गाडीच्या काचा फोडल्या नाहीत, तर आमदारांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या बंदुकधारी सुरक्षारक्षकांचे सरकारी शस्त्र हिसकावून घेण्याचाही प्रयत्न केला. या अनपेक्षित हल्ल्यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. मात्र घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी धाडस दाखवत रोहित आणि प्रदीप नावाच्या दोन आरोपींना पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.

या घटनेनंतर आमदार राजीव तरारा यांनी अत्यंत गंभीर आरोप करत हा हल्ला म्हणजे कोणताही अपघात नसून एक सुनियोजित षडयंत्र असल्याचे म्हटले आहे. त्यांनी असा दावा केला की, त्यांच्या जिवाला धोका निर्माण करण्यासाठीच हा कट रचला गेला होता. विशेष म्हणजे, आरोपींना पोलीस



कोठडीत असताना त्यांचे व्हिडिओ बनवून या प्रकरणाला मुद्दाम जातीय रंग देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. समाजात तेढ निर्माण करून वातावरण खराब करण्याच्या उद्देशाने काही शक्ती यामागे सक्रिय असल्याचे आमदारांचे म्हणणे आहे. या संवेदनशील घटनेची माहिती तातडीने देऊनही पोलीस घटनास्थळी पोहोचायला तब्बल 30 ते 35 मिनिटे उशीर झाल्याने, या प्रकरणातील पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवरही त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

आमदारांच्या तक्रारीची आणि सुरक्षेतील त्रुटींची गंभीर दखल घेत अमरोहाचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक (एसएसपी) यांनी मोठी कारवाई केली आहे. कर्तव्यात कसूर केल्याचा आणि माहिती मिळूनही उशिरा पोहोचल्याचा ठपका ठेवत एसएसआय सतीश कुमार, कस्बा इंचार्ज जुगल किशोर आणि आरक्षी अंशुल कुमार या तीन पोलीस कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. पोलिसांच्या मते, रोहित आणि प्रदीप या दोन मुख्य आरोपींना अटक करण्यात आली असून, या प्रकरणाशी संबंधित इतर फरार संशयितांचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. मात्र, दुसरीकडे सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला असून, त्यात आरोपी रोहितने असा दावा केला आहे की, त्याची दुचाकी आमदारांच्या गाडीला धडकली नव्हती, तरीही त्याला बेदम मारहाण करण्यात आली, ज्यामध्ये त्याचा हात मोडला आहे.

सध्या अमरोहामध्ये या घटनेमुळे तणावपूर्ण शांतता असून, राजकीय वतुर्ळात याचे तीव्र पडसाद उमटत आहेत. एकीकडे सत्ताधारी पक्षाच्या आमदारावर झालेला हल्ला ही चिंतेची बाब ठरत असताना, दुसरीकडे आरोपींनी केलेले दावे आणि पोलिसांवर झालेली कारवाई यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे. पोलीस आता या प्रकरणाची सखोल चौकशी करत असून, हा खरोखरच एखादा राजकीय कट होता की रस्त्यावरील वादातून उद्भवलेली हिंसा, याचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. या घटनेने स्थानिक पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, आगामी काळात या प्रकरणावरून उत्तर प्रदेशातील राजकारण अधिक तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

# अपहरणाच्या अफवेने घेतला बळी, तरुणाची जमावाने केली हत्या

**■जळगाव। प्रतिनिधी,**

जमावाकडून झालेल्या बेदम मारहाणीत एका ३० ते ३५ वर्षीय अनोळखी तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना जळगाव तालुक्यातील अव्हाणे शिवारात घडली आहे. मुलाला पळवून नेण्याच्या संशयावरून हा प्रकार घडला असून, या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांना ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव ते कानळदा रोडवरील अव्हाणे शिवारातील लक्ष्मी जिनिंग परिसरात सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी रात्री ७ ते ८ वाजेच्या सुमारास एक अनोळखी तरुण संशयास्पदरीत्या वावरत होता. हा तरुण तिथे राहणारे मनोहर भगवान सोनवणे यांचा ३ वर्षांचा मुलगा विराट उर्फ लकी याला उचलून घेऊन जात असल्याचा संशय उपस्थितांना आला. या संशयाने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आणि बघता बघता मोठा जमाव गोळा झाला.

जमावाने कोणत्याही प्रकारची खातरजमा न करता किंवा पोलिसांना कळवण्याऐवजी सदर तरुणाला पकडून लाथा-बुक्क्यांनी आणि मिळेल त्या वस्तूने बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. अव्हाणे गावचे सरपंच पिंटू पाटील यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून जळगाव तालुका पोलीस ठाण्याला माहिती दिली. पोलीस पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले असता, त्यांना तो तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला. त्याच्या नाका-तोंडातून रक्त येत होते आणि शरीरावर गंभीर जखमा होत्या.

गंभीर जखमी झालेल्या या तरुणाला पोलिसांनी तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, डोक्याला आणि शरीराच्या अंतर्गत भागाला मार लागल्याने तो शुद्धीवर येऊ शकला नाही. अखेर मंगळवारी २४ फेब्रुवारी रोजी पहाटे ४:३० वाजता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

### पाच संशयित ताब्यात

याप्रकरणी पोलिसांनी तत्परता दाखवत मनोहर सोनवणे, अजय कोळी, प्रशांत सोनवणे, अजय ऊर्फ बादल सोनवणे आणि अफताब आरिफ खाटीक अशा पाच संशयितांना ताब्यात घेतले आहे. जळगाव तालुका पोलीस ठाण्यात या पाच जणांसह इतर अनोळखी लोकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात पुन्हा एकदा 'मॉब लिंचिंग'चा प्रश्न ऐरणीवर आला असून नागरिकांनी कायदा हातात घेऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# 'तू माझी नाहीस तर कोणाचीच होणार नाहीस' एका एकतर्फी प्रेम करणाऱ्या तरुणाने भर मंडपात नवरीवर गोळ्या झाडल्या

**■नागपूर। प्रतिनिधी,**

लग्नाचा उत्साह, सनई-चौघड्यांचे सूर आणि आनंदाचे वातावरण असलेल्या विवाह सोहळ्यात एका सनकी प्रियकराने रक्ताचा सडा पडलाय. "तू माझी नाहीस तर कोणाचीच होऊ देणार नाही," या विकृत भावनेतून एका एकतर्फी प्रेम करणाऱ्या तरुणाने थेट स्टेजवर चढून नवरीच्या गळयात माळ पडण्यापूर्वीच तिच्यावर गोळ्या झाडल्या. बिहारच्या बक्सर जिल्ह्यातील चौसा नगर पंचायत परिसरात घडलेल्या या घटनेने संपूर्ण राज्य हादरले आहे.

**स्टेजवर चढला आणि गोळी झाडली...**

धार्मिक विधी सुरू असतानाच, आरोपी दीनबंधू मल्लाह याने तोंडाला रुमाल बांधून अचानक स्टेजवर प्रवेश केला. कोणाला काही समजण्यापूर्वीच त्याने कमरेला लावलेली बंदुक काढली आणि थेट आरतीवर गोळी झाडली. गोळी लागताच आरती रक्ताच्या थारोळ्यात स्टेजवरच कोसळली. या अनपेक्षित हल्ल्यामुळे लग्नमंडपात एकच पळापळ आणि किंकाळ्या सुरू झाल्या. गर्दी आणि गोंधळाचा फायदा



### नेमकं प्रकरण काय?

मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेशातील बलिया जिल्ह्यातून एक वरात बक्सरमधील मल्लाह टोली येथे आली होती. १८ वर्षीय आरती कुमारी हिचा विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात सुरू होता. वऱ्हाडी मंडळी जेवणाचा आस्वाद घेत होती, तर दुसरीकडे स्टेजवर धार्मिक विधी सुरू होता. नवरी आणि नवरदेव एकमेकांसमोर उभे होते, नातेवाईक फोटो काढण्यात मग्न होते. मात्र, याच गर्दीत मृत्यू दबा धरून बसला होता याची कुणालाच कल्पना नव्हती.

घेत आरोपी दीनबंधू तिथून पसार झाला.

**एकतर्फी प्रेमातून टोकाचं पाऊल**

आरोपी दीनबंधू हा आरतीच्या शेजारीच राहणारा आहे. त्याचे आरतीवर एकतर्फी प्रेम होते. आरतीचे लग्न दुसऱ्या मुलाशी ठरल्यापासून तो संतापलेला होता. त्याने यापूर्वीही आरतीच्या कुटुंबीयांना धमकी दिली होती की, "आरतीचे लग्न जर दुसऱ्या कोणाशी लावून दिले, तर मी तिला जिवंत सोडणार नाही." मात्र, कुटुंबीयांनी त्याच्या धमक्यांकडे फारसे गांभीयार्ने पाहिले नाही. अखेर आपल्या सनकी स्वभावातून त्याने लग्नाच्या दिवशीच हे खळबळजनक कृत्य केले.

**नवरीची प्रकृती चिंताजनक**

गोळीबाराच्या घटनेनंतर जखमी आरतीला तातडीने सदर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, गोळी वर्मी लागल्याने आणि रक्तस्त्राव जास्त झाल्यामुळे तिची प्रकृती खालावली. प्राथमिक उपचारानंतर डॉक्टरांनी तिला तातडीने वाराणसी येथील ट्रॉमा सेंटरमध्ये रेफर केले आहे. सध्या आरती मृत्यूशी झुंज देत असून तिची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

**पोलीस तपास आणि कारवाई**

घटनेची माहिती मिळताच मुफस्सिल पोलीस स्टेशनचे पथक घटनास्थळी दाखल झाले. अप्पर पोलीस निरीक्षक चंदन कुमार यांनी सांगितले की, "हा प्रकार एकतर्फी प्रेमातून घडल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. आरोपीची ओळख पटली असून त्याच्या अटकेसाठी ठिकठिकाणी छापेमारी सुरू आहे. लग्नमंडपातील प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवले जात आहेत." या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण असून, एका तरुणाच्या टोकाच्या निर्णयामुळे दोन कुटुंबांच्या आनंदावर विरजण पडले आहे. नवरी मुलगी सुखरूप राहावी यासाठी कुटुंबीय प्रार्थना करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com